रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ६७
www.ramprahar.com

◆ बुधवार, २३ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

कर्जतमध्ये विजांसह ढगफुटीसदृश्य पाऊस/२
श्रीवर्धन समुद्रकिनारी अत्याधुनिक इको टॉयलेट/५
आशियाई क्रीडा स्पर्धेत पार्थ मानेचा ‘रौप्य’वेध/८

## महाराष्ट्र विधान परिषदेच्या पाच जागांसाठी निवडणूक जाहीर

**मुंबई :** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेतील पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील



पाच जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर, पुणे विभाग पदवीधर, नागपूर विभाग पदवीधर, अमरावती विभाग शिक्षक आणि पुणे विभाग शिक्षक या पाच मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी २९ सप्टेंबर रोजी अधिसूचना प्रसिद्ध होईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर, अर्जांची छाननी ७ ऑक्टोबर, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर आहे. मतदान २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत होईल, तर मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी करण्यात येणार आहे. दरम्यान, या संबंधित मतदारसंघांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

### राज्यातील दुष्काळासंदर्भात येत्या शनिवारपर्यंत अधिसूचना

# मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना

### आजपासून पंचनामे सुरू करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील दुष्काळासंदर्भात येत्या शनिवारपर्यंत पहिली अधिसूचना जारी केली जाईल. दुष्काळी परिस्थितीवर उपाययोजनांसाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. तत्काळ उद्यापासून फिल्डवर जाऊन पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. त्या आधारे माहिती घेऊन शेतकऱ्यांना मदत दिली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि.२२) दिली. मंत्रिमंडळ बैठकीनंतर ते बोलत होते.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, साधारणपणे बहुतांश भागात दुष्काळी परिस्थिती दिसत आहे, पिके करपली आहेत. विषेशतः सोबायीन, मका, कापूस, ज्वारी यावर सर्वाधिक परिणाम झालेला दिसतोय. कोकणातही भातावर



परिणाम झाला आहे. दुष्काळासंदर्भातील प्राथमिक डेटा गोळा करण्यात आला आहे. त्या आधारावर पहिली अधिसूचना शनिवारपर्यंत काढणार आहोत. आपल्याकडे असलेल्या माहिती आणि आकडेवारीवर आधारित कुठे दुष्काळ आणि त्याच्या उपाययोजना काय याबाबत अधिसूचना असेल. त्यानंतरही डेटा येतच राहणार आहे. एखादा भाग सुटला तर त्यामध्ये समाविष्ट करता येईल.

शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी गतीने निर्णय घेता यावा यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीमध्ये जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील, मृद व जलसंधारणमंत्री संजय राठोड, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील या मंत्र्यांचा समावेश आहे. मुख्य सचिव राजेश अगरवाल या समितीचे सदस्य सचिव असतील. राज्यभरातून येणाऱ्या माहितीच्या आधारे कोणत्या भागात दुष्काळ आहे, तिथे काय मदत व उपायोजना करायची याबाबत ही समिती निर्णय घेईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना मदतीसाठी एनडीआरएफच्या निकषानुसार केंद्र सरकारकडेही मदतीबाबतचा प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे. याशिवाय पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी चारा यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. आगामी सात ते आठ महिन्यांचे नियोजन केले जाईल. पिण्याच्या पाण्यासाठी राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या समन्वयातून हे नियोजन केले जाणार आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

#### मुख्यमंत्री, मंत्री आणि लोकप्रतिनिधी करणार दौरा

राज्यातील दुष्काळसदृश भागाची उद्यापासून मी स्वत: पाहणी करणार असून मंत्री आणि लोकप्रतिनिधींनाही बांधावर जाऊन पाहणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत, जेणेकरून परिस्थिती लक्षात येते आणि संवादही होतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## ‘विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्या सरकार पूर्ण करणार’

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर अध्यक्षांच्या राजीनाम्याची होत असलेली मागणी ही राजकीय स्वरूपाची असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना सरकारचे प्राधान्य असल्याचे स्पष्ट केले.

एमपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी ज्या परीक्षा किंवा कथित घोटाळ्याच्या संदर्भात केली जात आहे, तो प्रकार संबंधित अध्यक्षपदावर येण्यापूर्वीच घडला होता. एमपीएससीच्या भरतीसंदर्भातील अधिकार राज्यपालांकडे आहेत. एखाद्या व्यक्तीने संस्थेत काय काम केले, त्याच्या कामाचे मूल्यमापन काय आहे याचा विचार न करता कोणतीही चौकशी किंवा पुरावे नसताना केवळ राजकीय मागणी करणे योग्य नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

एमपीएससीच्या परीक्षांबाबत व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या सुनावण्या सुरू असून आता पुन्हा बहुपर्यायी पद्धत लागू करण्याची मागणी जोर धरत आहे. याबाबत समिती विचार करत असून समितीने तशी शिफारस केल्यास शासन त्याकडे सकारात्मकपणे पाहील, असे मुख्यमंत्री म्हणाले.

पुढच्या परीक्षेत आतापर्यंतचे सगळे विक्रम मोडणारी पदे आणण्याचा निर्णय आम्ही केला आहे. त्याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील रिक्त पदे भरण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याबाबतही विचार सुरू आहे. एमपीएससीसंदर्भातील समितीचा अहवाल आल्यानंतर त्यावर शासन निर्णय घेणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.



## कर्मवीरांच्या विचारांचा आयुष्यावर मोठा प्रभाव -लोकनेते रामशेठ ठाकूर

### नवी मुंबईत जयंती उत्साहात साजरी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

“माझ्या आयुष्यात अण्णांचा खूप मोठा प्रभाव आहे आणि त्यांच्या विचार व कार्यपद्धतीनुसार जगण्याचा मी सातत्याने प्रयत्न करतो,” असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वाशी येथे केले.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९वी जयंती मंगळवारी (दि.२२) वाशी येथे उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त कर्मवीरांच्या प्रतिमेची मॉडर्न स्कूल ते कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय अशी रथयात्रा काढण्यात आली. त्यानंतर महाविद्यालयाच्या सभागृहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष जयश्री चौगुले, सामाजिक कार्यकर्त्या प्रा. वृषाली मगदुम, डॉ. अजित मगदुम, नवी मुंबईचे उपमहापौर दशरथ भगत, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अविनाश लाड यांच्यासह मॉडर्न स्कूलच्या प्राचार्य सुमित्रा भोसले, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या प्राचार्य शुभदा नायक यांची उपस्थिती होती.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम असून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली, असे प्रतिपादन मान्यवरांनी आपल्या भाषणातून केले. कर्मवीरांच्या कार्याचा गौरव करीत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहनही करण्यात आले.

कार्यक्रमास रयतसेवक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कर्मवीरांच्या प्रतिमेला अभिवादन करून त्यांच्या कार्याची प्रेरणा घेण्याचा संकल्प उपस्थितांनी केला.

#### मगदुम दाम्पत्याला पुरस्कार

*यावेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दाम्पत्याचा दरवर्षीप्रमाणे सन्मान करण्यात आला. यंदा अन्वय फाउंडेशनचे संस्थापक तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. अजित मगदुम यांना कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार, तर सामाजिक कार्यकर्त्या प्रा. वृषाली मगदुम यांना रयत माऊली पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.*




## कर्मवीरांना अभिवादन!

**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, जनरल बॉडी सदस्य तथा माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, सौ. शकुंतला ठाकूर विद्यालयाचे चेअरमन नगरसेवक परेश ठाकूर आदींनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**
**(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)**

## पोलादपूरमध्ये वडिलांकडून तरुण मुलाचा निर्घृण खून

**पोलादपूर :** मुंबई येथून काही महिन्यांपूर्वी येऊन पोलादपूर शहरानजीकच्या लोहारे देऊळकोंड येथे राहणाऱ्या ओंबळी गावातील सचिन बजरंग चिकणे याने अज्ञात कारणावरून संतप्त होऊन स्वतःचा तरुण मुलगा साहिल सचिन चिकणे (२४) याला धारदार शस्त्राने हल्ला करून रक्तबंबाळ अवस्थेत ठार केले. या घटनेनंतर तरुणाच्या वडिलांनी घटनास्थळावरून पलायन केले. पोलिसांनी फरार बापाला पाच तासांत जेरबंद केले.

दरम्यान, फॉरेन्सिक टीमला पाचारण करीत गुन्ह्याचे ठिकाण असलेले घर पोलिसांनी सील केले. फॉरेन्सिक टीमकडून गुन्ह्याचे कारण व घटनाक्रम याचा संदर्भ तसेच त्यावेळी घडलेल्या शक्यतांचा अभ्यास सुरू केला. मृत साहिल चिकणे याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.




## मुसळधार पावसाने माथेरान रेल्वेमार्गावर दरड कोसळली

**नेरळ : प्रतिनिधी**

मुसळधार पावसाचा फटका नेरळ-माथेरान रेल्वे घाटमार्गालाही बसला असून कड्यावरचा गणपती परिसरात रेल्वे रुळावर दरड कोसळली आहे. त्यामुळे या रेल्वेमार्गावरील माल वाहतूक ठप्प झाली आहे.

कड्यावरचा गणपती येथे दर्शनासाठी गेलेले भक्त कमलेश ठक्कर यांना मंगळवारी (दि.२२) सकाळी सुमारे ७च्या सुमारास रेल्वे रूळावर मोठ्या प्रमाणात दगड आणि माती पडल्याचे निदर्शनास आले. यामुळे या परिसरातून जाणारी वाटही बंद झाली आहे.



नेरळ-माथेरान हा सुमारे २१ किलोमीटरचा वळणावळणाचा घाटमार्ग असून या मार्गावर उंच डोंगर, तीव्र चढ-उतार आणि खोल दऱ्या आहेत. त्यामुळे पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका कायम असतो. सध्या मान्सूनमुळे नेरळ-माथेरान टॉय ट्रेन सेवा बंद असल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळली, मात्र या रेल्वेमार्गावरून माथेरानला आवश्यक साहित्य पोहचविण्यासाठी मालवाहतुकीचा वापर केला जातो. दरड हटवून मार्ग पूर्ववत होईपर्यंत यावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, दसऱ्याच्या मुहूर्तावर नेरळ-माथेरान टॉय ट्रेन सेवा पुन्हा सुरू करण्याची तयारी होत असताना रेल्वेघाटात दरड कोसळल्याने मार्गाच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. त्यामुळे रेल्वेसेवा सुरू करण्यापूर्वी दरड हटविणे, रेल्वे रुळांची पाहणी करणे आणि घाटमार्गातील धोकादायक ठिकाणांची सुरक्षितता तपासणे आवश्यक ठरणार आहे.

## निवडक

### विशाखा राऊतांची अपात्रता कायम

**मुंबई :** उबाठा गटाच्या माजी नगरसेविका विशाखा राऊत यांचे पद बोगस जात प्रमाणपत्र प्रकरणामुळे रद्द होण्याच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयानेही शिक्कामोर्तब केले आहे. सुप्रीम कोर्टाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला तसेच जात पडताळणी समितीच्या आदेशाला स्थगिती देण्यास स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. त्यामुळे राऊत यांची नगरसेवकपदावरील अपात्रता कायम राहिली असून त्यांना कोणताही अंतरिम दिलासा मिळालेला नाही.

### राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे वितरण

**अहमदाबाद :** ७२व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या विजेत्यांची घोषणा झाल्यानंतर दोन महिन्यांनी मंगळवारी (दि.२२ ) गुजरातच्या एकता नगरमध्ये या पुरस्कार सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विविध श्रेणींमधील विजेत्या कलाकारांना आणि तंत्रज्ञांना पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

## आशियाई क्रीडा स्पर्धेत टीम इंडियाला सुवर्णपदक

### महिला क्रिकेट संघाकडून श्रीलंकेचा धुव्वा

**निशिन (जपान) : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धेत हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रिकेट संघाने श्रीलंकेचा एकतर्फी पराभव करत सुवर्णपदक जिंकले. विशेष म्हणजे जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताचे हे पहिले सुवर्णपदक ठरले.

स्मृती मानधना आणि शफाली वर्माच्या धमाकेदार खेळीच्या जोरावर टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत तीन विकेट्सच्या मोबदल्यात विक्रमी २१६ धावा करत श्रीलंकेसमोर तगडे लक्ष्य ठेवले. या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेचा डाव १५.४ षटकांत अवघ्या ६९ धावांवर आटोपला.

फायनलमध्ये नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना सलामीवीर स्मृती मानधना आणि शफाली वर्माने पहिल्या विकेटसाठी ९९ धावांची दमदार भागीदारी केली. स्मृतीने आक्रमक



फलंदाजी करत अवघ्या ३० चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. तिने ४५ चेंडूंत पाच चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने ७९ धावांची तुफानी खेळी केली. शफाली अर्धशतकापासून दोन धावांनी हुकली. तिने ४८ धावा केल्या. कर्णधार हरमनप्रीत कौरने १९ धावांचे योगदान दिले. यानंतर रिचा घोषने वेगाने धावा करत भारताला २०० धावांचा टप्पा पार करून दिला. तिने २२ चेंडूंत नाबाद ४९ धावा केल्या.

२१७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या श्रीलंकेची सुरुवात खराब झाली. सलामीवीर इमेशा दुलानी १० चेंडूंत तीन धावा करून बाद झाली. त्यानंतर हसिनी परेरा खातेही न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतली. श्रीलंकेसाठी कर्णधार चमारी अट्टापट्टूने सर्वाधिक २१ चेंडूंत २९ धावा केल्या. तिच्यानंतर कविशा दिलहारीने ११ धावांचे योगदान दिले, मात्र इतर फलंदाजांना विशेष काही करता आले नाही. भारताकडून दीप्ती शर्माने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. श्री चरणी आणि श्रेयंका पाटील यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेत श्रीलंकेच्या फलंदाजीला कुचकामी ठरवले.

दरम्यान, श्रीलंकेला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. याआधी पाकिस्तानने बांगलादेशचा पराभव करीत कांस्यपदक पटकावले होते.

# ‘अंगणवाडी सेविकांची पुढील पिढीच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका’

**सोलापूर : प्रतिनिधी**

अंगणवाडी सेविका या केवळ सेविका नसून बालकांच्या संगोपनासह त्यांच्या सर्वांगीण विकासात मातृत्वाची भूमिका बजावत आहेत. समाजाची पुढील पिढी घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्या करीत असून, त्यांच्या कार्याचा गौरव करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.




शिवछत्रपती रंग भवन येथील सभागृहात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त अंगणवाडी सेविकांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्राथमिक स्वरूपात २५ अंगणवाडी सेविकांचा सन्मान करण्यात आला.

मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी २०४७ पर्यंत विविध क्षेत्रांत सातत्याने काम करण्याची गरज आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, स्वच्छता अभियान तसेच अंगणवाडी सेविकांचा सन्मान अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.अंगणवाडी सेविका बालकांच्या पोषण, संगोपन आणि विकासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. पुढील पिढीच्या जडणघडणीत त्यांचे योगदान मोलाचे आहे. महिलांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत. महिला सक्षम झाल्यास कुटुंब आणि समाज अधिक सक्षम होतो. महिला व बालकांच्या कल्याणासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध लाभार्थी व नागरिकांपर्यंत शासनाच्या योजना व उपक्रमांची माहिती पोहोचविण्यासाठी जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. समाजातील विविध घटकांचा सहभाग वाढवून विकासाची प्रक्रिया अधिक व्यापक करण्यावर भर देण्यात येत असल्याचे मंत्री पाटील यांनी सांगितले.संयोजक मोहन डोंगरे यांनी अंगणवाडी सेविकांच्या कार्याचे कौतुक करताना, बालकांच्या संगोपनासह पोषण आणि सामाजिक जडणघडणीत त्या महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे सांगितले. यावेळी नगरसेविका रोहिणी तडवळकर यांनीही अंगणवाडी सेविकांच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमास उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, प्रशांत फत्तेपूरकर, स्थायी समिती सभापती रणजीता चाकोते, शिक्षणाधिकारी धनंजय ढेपे, शशिकांत चव्हाण, बाल विकास अधिकारी दीपक ढेपे यांच्यासह अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

# फिल्टरेशन प्लांटमधूनही माणगावात गढूळ पाणी

## जल तपासणी अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी

**माणगाव : बातमीदार**

माणगाव शहरातील नागरिकांना गेल्या तीन–चार दिवसांपासून अनियमित वेळेत, अत्यंत कमी दाबाने तसेच गढूळ पाणीपुरवठा होत असल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर काही मिनिटांतच पाणी बंद होणे आणि त्यानंतर सुमारे अर्ध्या तासाने पुन्हा चांगल्या दाबाने पाणी येणे, असा प्रकार वारंवार घडत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.



गेल्या दोन–तीन आठवड्यांत परिसरात मोठ्या प्रमाणावर पाऊस झालेला नसतानाही पाण्याचा दर्जा गढूळ आहे. रविवार, आणि सोमवार रोजी सायंकाळच्या सुमारास पाऊस झाला. मंगळवारीही पावसाच्या सरी झाल्या. त्यामुळे परिसरातील नद्या लालसर व गढूळ पाण्याने वाहताना दिसून आल्या, मात्र माणगाव नगरपंचायतीकडून फिल्टरेशन प्लांटमधून प्रक्रिया करून पाणीपुरवठा केला जात असल्याचे सांगितले जात असताना नागरिकांच्या नळाला गढूळ पाणी का येत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

मंगळवारी सकाळी ९.२० ते ९.४० वाजेपर्यंत तसेच पुन्हा सकाळी १०.३० ते दुपारी १२.१० वाजेपर्यंत पाणीपुरवठा झाला. सुरुवातीला गढूळ पाणी, त्यानंतर काही प्रमाणात अस्वच्छ पाणी आणि अखेरीस तुलनेने स्वच्छ पाणी येत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. यावेळी पाण्याचा दाब चांगला होता आणि दोन तासांहून अधिक काळ पाणीपुरवठा सुरू राहिला.मात्र, पाणीपुरवठ्याची वेळ निश्चित नसणे, सुरुवातीला अत्यंत कमी दाबाने पाणी येणे आणि त्यातच गढूळ पाणी मिळणे, यामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे.

पाणीपुरवठा सुरू करण्यापूर्वी जलवाहिन्यांमधील गळती, साठवण टाक्यांची स्वच्छता, पाइपलाइनमध्ये साचलेला गाळ तसेच फिल्टरेशन प्लांटमधील गाळणी यंत्रणेची कार्यक्षमता यांची तपासणी करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे तसेच नळाच्या पाण्याचे नमुने अधिकृत प्रयोगशाळेत तपासून त्याचा अहवाल नागरिकांसाठी सार्वजनिक करावा, अशी मागणीही होत आहे.

# कर्जतमध्ये ढगफुटीसदृश्य पाऊस

## विजेच्या ठिणगीने मच्छरदाणी पेटली

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील गुरुनगर येथे काल सायंकाळी विजांच्या कडकडाटासह झालेल्या मुसळधार पावसात अनेकांचे नुकसान झाले. एक तासात तब्बल ११२ मी. मी. पाऊस पडल्याचा अंदाज वर्तविण्यात आला असून विजेच्या ठिणगीने खिडकीच्या ग्रिलला लावलेल्या मच्छर दाणीने पेट घेतला तर काही घरांमध्ये पाणी शिरले, काहींची विजेची उपकरणे निकामी झाली. गेले तीन महिने पडत असलेल्या पावसापेक्षा कालचा पाऊस भयानक होता. असे अनेकांनी सांगितले.



काल सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास अचानक पाऊस सुरु झाला. त्यानंतर थोड्याच वेळात पावसाने रौद्र रुप धारण केले. ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडाट सुरु झाला आणि मुसळधार पाऊस पडू लागला. या पावसाने गुरुनगर मध्ये राहणाऱ्या श्रीराम फाटक यांच्या घराच्या खिडकीजवळ विजेची ठिणगी पडली. या ठिणगीने खिडकीला लावलेल्या मच्छरदाणीने पेट घेतला. ही बाब मंजिरी फाटक यांच्या लक्षात आली. त्यांनी प्रसंगावधान म्हणून बादल्यांनी पाणी मारून आग विझवली. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. यावेळी घरात त्यांची वयोवृद्ध आई असल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक सखल भाग जलमय झाले. इंदिरानगर वसाहतीतील काही घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे हाल झाले.

# ‘रयत’चा वटवृक्ष एआयच्या युगातही बहरतोय -एआय तज्ज्ञ डॉ.केळकर

## कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३९वा जयंती सोहळा उत्साहात

**सातारा : रामप्रहर वृत्त**

कृत्रिम बुद्धिमत्ता हे चातुर्य असून त्याचा वापर करा पण त्यावर अवलंबून राहू नका. शिक्षण क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर होईल परंतू शिक्षकांची जागा तंत्रज्ञान घेऊ शकणार नाही. पण शिक्षणाला नवी दिशा देईल. तंत्रज्ञान हे शिक्षकांसाठी सहाय्यभूत असून तो पर्याय नाही. तंत्रज्ञान हे विद्यार्थ्यांवर मानवी भाव भावनांचे संस्कार करू शकणार नाही. रयत माऊलींनी संस्थेच्या उभारणीत केलेला निस्सीम त्याग आणि कर्मवीरांच्या कार्याचे मूल्यमापन कोणतेही तंत्रज्ञान परिपूर्ण करू शकणार नाही, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ए.आय. तज्ञ डॉ.भूषण केळकर यांनी व्यक्त केले.




रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३९वा जयंती सोहळा, सातारा येथे संपन्न झाला. संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सोहळ्यास प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय ए.आय. तज्ञ डॉ.भूषण केळकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.एम.बी. शेख, व्हा.चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या कुलाधिकारी खा.सुप्रियाताई सुळे, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, माध्यमिक शिक्षण विभागाचे सहसचिव बी.एन. पवार, ऑडीट विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. भूषण केळकर यांनी जगभरातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रगतीची माहिती देताना मानवी जीवनावर होणारे परिणाम विशद केले. शिक्षण क्षेत्रात त्याचा वापर कसा असावा याचा ऊहापोह करताना उपयुक्त मार्गदशन केले. चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी संस्थेचा प्रगतीबाबत बोलताना, रयत शैक्षणिक गुणवत्ता विकास आराखडा, रयतच्या सर्व शाखेत इंटरॲक्टीव्ह पॅनल, कृत्रिम बुध्दीमत्ता प्रशिक्षण, ईआरपी स्वॉफ्टवेअर, माजी विद्यार्थी संघटना, रयत स्पर्धा परीक्षा अकॅडमी, संशोधन आणि विकास विषयक नवीन धोरणाबद्दल माहिती दिली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते स्पर्धा परीक्षेतून वर्ग १ पदी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

# गणेशोत्सवात आदिवासी महिलांना मिळाली रोजगाराची संधी

**मुरुड : प्रतिनिधी**

गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आदिवासी महिलांना रोजगाराची चांगली संधी उपलब्ध झाली असून, दुर्वा, बेल,केळीची पाने विविध प्रकारची फुले, गावठी भाजीपाला, पपनीस तसेच विविध फळांची विक्री करून या महिलांनी आर्थिक उत्पन्नाचा मार्ग निर्माण केला आहे.



गणपती उत्सवासाठी दुर्वा, बेलपत्र, फुले यांना मोठी मागणी असते. याचबरोबर गावाकडील ताजा भाजीपाला व हंगामी फळांनाही ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. आदिवासी महिला जंगल परिसरातून उपलब्ध होणाऱ्या नैसर्गिक वस्तू तसेच शेतातील उत्पादनांची विक्री करून उत्सवाच्या काळात चांगली आर्थिक उलाढाल करीत आहेत.गणेशोत्सवाच्या काळात बाजारपेठांमध्ये नागरिकांची मोठी गर्दी होत असल्याने महिलांना थेट ग्राहकांपर्यंत आपला माल विकण्याची संधी मिळत आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नात हातभार लागत असून, स्वावलंबनालाही चालना मिळत आहे.

गणपती उत्सवाच्या निमित्ताने पारंपरिक व स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ मिळत असून, आदिवासी महिलांच्या कष्टातून हजारो रुपयांची आर्थिक उलाढाल होत आहे. त्यामुळे उत्सव हा केवळ धार्मिक श्रद्धेचा सोहळा न राहता स्थानिक महिला व कुटुंबांसाठी रोजगाराचे साधन ठरत आहे.या उपक्रमामुळे महिलांना घराजवळच रोजगार उपलब्ध झाला असून त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नातही भर पडली आहे. गणपती उत्सवाच्या माध्यमातून स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ मिळाल्याने आदिवासी महिलांमध्ये आर्थिक स्वावलंबनाची भावना निर्माण होत आहे.उत्सव काळातील या विक्रीतून महिलांची चांगली आर्थिक उलाढाल झाली असून, स्थानिक बाजारपेठेला देखील चालना मिळाली आहे.

# मारहाण केल्याप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा

**नवीन पनवेल :** देशी दारूच्या दुकानात झालेल्या वादातून फिर्यादीसोबत हुज्जत घालून त्याला मारहाण केल्याप्रकरणी गोपाल बोहरे आणि प्रशिक साळवे यांच्या विरोधात २० सप्टेंबर रोजी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी रुपेश राजू वाघ हा अरुण बार समोरील सिडको गार्डन, सेक्टर दोन ई, कळंबोली येथे बसला होता. यावेळी प्रशिक साळवे आणि गोपाळ बोहरे यांनी येऊन देशी दारूच्या दुकानात झालेल्या वादातून त्याला मारहाण केली.



**चौक : ग्रुप ग्रामपंचायत चौक सरपंच रितू हर्षल मोरे यांच्या निवासस्थानी दर्शन घेताना खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे, पत्रकार अर्जुन कदम, हर्षल मोरे.**

# रोह्यातील एक गाव एक गणपती ‘नको मोबाईल’चा देतोय संदेश!

**धाटाव : प्रतिनिधी**

मोबाईलच्या अतिवापरामुळे कुटुंबातील संवाद आणि संस्कारांवर होत असलेल्या परिणामांचे भीषण वास्तव रोहयाच्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने आपल्या देखाव्यातून मांडले आहे. ‘मोबाईल आणि सोशल मीडियाचा अतिवापर टाळा’ असा संदेश देणारा हा पर्यावरणपूरक देखावा भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. अवघ्या रोहा वासियांचा एक गाव एक गणेशोत्सव आसलेंल्या रोहा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे यंदाचे १०५ वे वर्ष आहे.



पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून ज्येष्ठ कलाकार विशाल दंडगव्हाळ यांनी हा देखावा साकारला आहे. प्लायवुडवर कागदाच्या माध्यमातून आई वडिल – मुले आणि तरुण, त्यांचे मोबाईल आणि फेसबुक, इंस्टाग्राम व्हाट्सअप आदी सोशल मीडियामुळे हिरावलेल्या कौटुंबिक संवाद, आणि वेळेचा अपव्यय कसे होते.? हे सांगणारे बोलके चित्रणासोबत कानावर पडणारे प्रबोधनाचे प्रभावी शब्द हा देखावा पाहताना भक्तांना खोलवर विचार करायला लावत आहेत. सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे माणूस त्याच्या आहारी कसा जातो, हे ‘नको मोबाईल आणि सोशल मीडिया’ या संकल्पनेतून प्रभावीपणे दाखविण्यात आले आहे.

दिवसभर इंटरनेटच्या जाळ्यात अडकलेला माणूस घरी आल्यानंतर कुटुंबीयांशी संवाद साधण्याऐवजी मोबाईलमध्ये अधिक वेळ घालवतो. त्यामुळे कौटुंबिक संवाद कमी होऊन संस्कारांचे गाठोडे बाजूला सारले जात असल्याची खंत मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

मोबाईलाचा अतिवापर टाळणे गरजेचे आहे. नागरिकांमध्ये याबाबत जनजागृती व्हावी, यासाठी हा देखावा साकारण्यात आला आहे, असे मंडळाचे अध्यक्ष अमेय जोशी यांनी सांगितले. उत्सव समितीचे उपाध्यक्ष प्रतीम देशमुख, हर्षद भाटे,प्रेषित बारटक्के, चैतन्य आठवले, नागेश पाटणकर, भारत वाकचौरे, कुणाल आंबले, सुयोग शेळके, चंद्रकांत पार्टे आदींचे उपक्रमासाठी सहकार्य लाभले. याच बरोबर यंदा उत्सव समितीने स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. कार्यक्रमांमध्ये नावीन्य आणण्यासोबतच जुन्या परंपरा व नव्या सुधारणा यांचा सुयोग्य संगम या समितीने साधले आहे.

# पळसदरी–कर्जतदरम्यान लोकल तासभर ठप्प

**नेरळ : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या खोपोली मुंबई सीएसएमटी लोकलमध्ये मंगळवारी सायंकाळी मोठा तांत्रिक बिघाड झाल्याने पळसदरी व कर्जत रेल्वे स्थानकादरम्यान लोकल तब्बल एक तास ठप्प राहिली. त्यामुळे शेकडो प्रवाशांचे हाल झाले असून, अंधार पडल्याने अनेक प्रवाशांनी जीव धोक्यात घालून मोबाईल टॉर्चच्या उजेडात रेल्वे रुळांवरूनच पायी कर्जत गाठले. मध्य रेल्वेच्या ढिसाळ कारभाराचा फटका पुन्हा एकदा प्रवासी नागरिकांना सहन करावा लागला.



रेल्वे विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, खोपोली स्थानकातून सायंकाळी ६ वाजून २ मिनिटांनी मुंबई सीएसएमटीकडे रवाना झालेली लोकल पळसदरी स्थानक सोडल्यानंतर कर्जत स्थानकाच्या अलीकडे सुमारे अडीच किलोमीटर अंतरावर अचानक थांबली. तपासणीदरम्यान मोटरमनला MRI पाईपमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे खबरदारी म्हणून लोकल मार्गातच थांबविण्यात आली.

दरम्यान, सायंकाळचे अंधाराचे वातावरण निर्माण झाल्याने लोकलमधील प्रवाशांमध्ये अस्वस्थता पसरली. बराच वेळ कोणतीही हालचाल न झाल्याने अनेक प्रवाशांनी रेल्वे रुळांवर उतरून मोबाईलच्या टॉर्चच्या प्रकाशात पायी कर्जत स्थानकाच्या दिशेने चालण्यास सुरुवात केली. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांनाही या प्रकाराचा मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

रेल्वे तांत्रिक पथकाने घटनास्थळी पोहोचून बिघाड दूर केल्यानंतर सुमारे एक तासाने सात वाजून वीस मिनिटे लोकल पुन्हा सुरू करण्यात आली. या घटनेमुळे खोपोलीकर्जत मार्गावरील लोकल वाहतुकीवरही काही काळ परिणाम झाला.

वारंवार होणाऱ्या तांत्रिक बिघाडांमुळे प्रवाशांच्या सुरक्षेसह रेल्वे प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, मध्य रेल्वेने अशा घटनांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# अरुण नाईक यांना पितृशोक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

टीआयपीएलचे सेवानिवृत्त लेखा व्यवस्थापक अरुण नाईक यांचे वडील जनार्दन काशिनाथ नाईक यांचे सोमवार २१ सप्टेंबर रोजी वयाच्या ९६व्या वर्षी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांचे पश्चात तीन मुले, दोन मुली, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.



जनार्दन नाईक यांनी इयत्ता पाचवीपर्यंत शिक्षण घेतले. त्यांना पुढील शिक्षण घेता आले नाही. सोबतचे मित्र सातवी पास होऊन शिक्षक झाले, म्हणून शेतीमध्ये राबून मुलांना उच्चशिक्षित केले. मुलांच्या हाताला काम असावे म्हणून नापीक जमीन विकत घेऊन विकसित केली. शेतीसोबत दुधाचा व्यवसाय केला आठ अपत्य असून ती कधीही उपाशी राहणार नाही अशी व्यवस्था करुन ठेवली कष्टाचे जीवन जगले, पण स्वाभिमान सोडला नाही.

नाईक हे लोकनेते दि.बा. पाटील, दत्तूशेठ पाटील यांचे समवेत राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत होते. त्यांनी विंधणे ग्रुप ग्रामपंचायत सदस्य म्हणून काम केले. टाकीगावची शाळा ,श्री कृष्ण मंदिर याची उभारणी करीत असताना विनामूल्य मेस्त्री काम केले. १९७३ साली टाकीगावचा तलाव खोदाई करुन घेतला.

कै. नाईक यांचा दशक्रिया विधी बुधवार ३० सप्टेंबर रोजी श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथे होईल. होम विधी शुक्रवार २ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता त्यांचे राहते घरी होणार आहे. उत्तरकार्य सकाळी १० वाजता टाकीगाव येथे होणार आहे.

# रुग्णसेवेसाठी पनवेल मनपा सज्ज

## अतिरिक्त आयुक्तांकडून मोफत डायलिसिस केंद्रांची पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील किडनी आजाराने ग्रस्त रुग्णांना मोफत डायलिसिस सेवा उपलब्ध करून देण्यासाठी खारघर प्लॉट नं. १७, सेक्टर-३६ आणि नवीन पनवेलमधील जी-१, सेक्टर-६ येथे प्रत्येकी २५ खाटांची दोन अत्याधुनिक मोफत डायलिसिस युनिट्सचे काम महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. सोमवारी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) गणेश शेटे यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत या दोन्ही डायलिसिस सेंटरच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

यावेळी मुख्य अभियंता राजेश कर्डिले, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, अभियंता प्रीतम पाटील, दिलीप बोकाडे, कनिष्ठ अभियंता महेश वाघमारे, विद्युत विभागप्रमुख किरण जाधव तसेच सल्लागार व ठेकेदार उपस्थित होते. कामोठे येथे मलनिःसारण केंद्रांतर्गत उभारण्यात येत असलेल्या १५ दललि. क्षमतेच्या पाणी पुनर्वापर प्रक्रिया केंद्राच्या कामाची पाहणी अतिरिक्त आयुक्तांनी केली.





### दैनंदिन २०० रुग्णांना लाभ

दोन्ही केंद्रांमध्ये आयसीयू दर्जाच्या सुविधा व उच्च दर्जाच्या आधुनिक डायलिसिस मशिन उपलब्ध असणार आहेत. प्रत्येक सेंटरमध्ये दररोज तीन शिफ्टमध्ये १०० रुग्णांवर उपचार केले जातील. दोन्ही केंद्रांत मिळून दररोज २०० रुग्णांना सेवा पुरविण्याची क्षमता निर्माण होणार आहे. आठवड्यातून ६०० रुग्णांना तीन वेळा मोफत डायलिसिस सेवा मिळेल. किडनी रुग्णांना आठवड्यातून दोन-तीन वेळा डायलिसिस करावे लागत असल्याने यामुळे रुग्णांचा प्रतीक्षा कालावधी कमी होणार आहे. मोफत असलेल्या या सुविधेमुळे पनवेल पालिका क्षेत्रातील हजारो किडनीग्रस्त रुग्णांना दिलासा मिळणार आहे. त्यामुळे डायलिसिस सेंटरचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने महापौर नितीन पाटील तसेच आयुक्त मंगेश चितळे यांनी संबंधित विभागास सूचित केले आहे.

### आरोग्य पथक, विशेष खाटांचे नियोजन

या युनिट्समध्ये तज्ज्ञ नेफ्रोलॉजिस्ट, अनुभवी डायलिसिस डॉक्टर्स, प्रशिक्षित डायलिसिस तंत्रज्ञ आणि परिचारिका पूर्ण वेळ कार्यरत असणार आहेत. प्रत्येक २५ खाटांपैकी पाच खाटा संसर्गजन्य आजार (हेपेटायटिस बी/सी आणि एचआयव्ही) असलेल्या रुग्णांसाठी, दोन खाटा गरोदर महिला व बालकांसाठी, तर दोन खाटा पालिकेच्या आजी-माजी कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. उपचारादरम्यान रुग्णाची प्रकृती गंभीर झाल्यास पालिकेच्या रुग्णवाहिकेद्वारे रुग्णाला तत्काळ शासकीय रुग्णालयात दाखल केले जाईल आणि पालिकेची वैद्यकीय टीम त्या रुग्णाचा पुढील पाठपुरावा घेईल.

# डम्परमधील डिझेल लुटल्याप्रकरणी दोघांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

पळस्पे-जेएनपीटी महामार्गावरील नांदगाव येथे डम्परचालकाला चाकू व लोखंडी रॉडचा धाक दाखवून डम्परमधील ३१० लिटर डिझेल लुटल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी १६० लिटर डिझेल, सुमारे सात लाख रुपये किमतीची हुंदाई कार, लोखंडी रॉड आणि प्लास्टिक पाइप असा मुद्देमाल जप्त केला आहे.

डम्परचालकाने नांदगाव येथे डम्पर रस्त्याच्या कडेला उभा केला होता. तो लघुशंकेसाठी गेला असता लाल रंगाच्या व्हर्ना कारमधून तसेच राखाडी रंगाच्या आय-१० कारमधून आलेल्या चार जणांनी त्याला चाकू व लोखंडी रॉडचा धाक दाखवला. त्यानंतर डम्परमधील सुमारे ३० हजार ३८० रुपये किमतीचे ३१० लिटर डिझेल घेऊन आरोपी पसार झाल्याने याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, पोलीस हवालदार तुषार बोरसे, पोलीस नाईक सम्राट डाकी, अनिल चव्हाण, पोलीस शिपाई दत्ता जाधव, विशाल दुधे आणि सचिन कोर आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे राजकुमार जयनारायण माझी (२३) आणि आशिक तय्यब अन्सारी (२२) यांना अटक केली.

दरम्यान, त्यांच्याकडून सात लाख रुपये किमतीची लाल रंगाची हुंदाई कार जप्त केली तसेच सुमारे १७ हजार ६८० रुपये किमतीचे १६० लिटर डिझेल, लोखंडी रॉड आणि हिरव्या रंगाचा ७८ इंच लांबीचा प्लास्टिक पाइप जप्त करण्यात आला आहे. या जप्त मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे सात लाख १७ हजार ६८० रुपये इतकी आहे. या गुन्ह्यातील शाहीद, रा. गोवंडी, मुंबई आणि फरहान या अन्य दोन संशयितांचा शोध सुरू आहे.

## बेवारस इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत आजारी अवस्थेत आढळलेल्या एका अनोळखी बेवारस इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १९४ अन्वये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार संबंधित इसम आजारी अवस्थेत आढळून आल्यानंतर पोलीस हवालदार केसरी भगवान पाटील यांनी त्याला उपचारासाठी पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. मयत इसमाचे वय अंदाजे ४० वर्षे असून उंची सुमारे पाच फूट, सडपातळ शरीरयष्टी, काळी वाढलेली दाढी आणि काळे वाढलेले केस असे त्याचे वर्णन पोलीस नोंदीत करण्यात आले आहे. त्याची ओळख अद्याप पटलेली नाही.

## केएमबी फाउंडेशनच्या गणेश सजावट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

केएमबी ग्लोबल ह्युमॅनिटी फाउंडेशनतर्फे आयोजित गणेश सजावट व मूर्ती स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. घरगुती गणेश सजावटीच्या माध्यमातून कला, संस्कृती, भक्ती आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.




दरम्यान, स्पर्धेत प्रथम क्रमांक दिलीप नामदेव पाटील, द्वितीय क्रमांक साहिल दत्ता मुकादम, तर तृतीय क्रमांक दर्शन सुजित थोरात यांनी पटकावला. याशिवाय उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सहभागींसाठी पाच विशेष पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.स्पर्धेतील सर्व विजेते आणि सहभागींचे फाउंडेशनचे संस्थापक मोहनिश अनंत भोईर आणि अ‍ॅड. कोमल मोहनिश भोईर यांनी अभिनंदन केले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून कलात्मकता, सर्जनशीलता आणि सांस्कृतिक मूल्यांना प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाचे सहभागी व नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.

## पनवेलचे नाव उंचावणाऱ्यांचा अभिमान -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या पुढील पिढ्यांनी ज्यांच्याकडे पाहून प्रेरणा घ्यावी व आपले कर्तृत्व घडवावे, अशा कर्तृत्ववान व्यक्ती व संस्थांचा पनवेल टाइम्स सन्मान पुरस्कार देऊन गौरव होत असल्याचा आनंद आहे. पनवेलचे नाव उंचावणाऱ्या व्यक्ती व संस्थांच्या योगदानाचा अभिमान आहे, असे प्रतिपादन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.



गणेश कोळी संपादित पनवेल टाइम्सच्या १८व्या वर्धापन दिनानिमित्त पनवेल टाइम्स सन्मान पुरस्काराचे आयोजन पनवेलमधील सुरुची बँक्वेट हॉल येथे करण्यात आले होते. या सोहळ्यासाठी महापौर नितीन पाटील, लावणी कलाकार हिंदवी पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, भाजप नेते प्रीतम म्हात्रे उपस्थित होते. यावेळी पनवेलचे नाव उंचावणाऱ्या व्यक्ती व संस्थांना पनवेल टाइम्स सन्मानाने गौरविण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, पनवेलचा विकास झपाट्याने होत असून आगामी काळात देशाच्या विकासाच्या नकाशावर पनवेलचा ठसा ठळकपणे उमटणार आहे. विकसित पनवेलच्या प्रगतीचे आपण सर्वजण साक्षीदार असून विकासयात्रेचा आपण एक भाग आहोत.

महापौर नितीन पाटील यांनी 'पनवेल टाइम्स'ला अनेक वर्षांची पत्रकारितेची समृद्ध परंपरा लाभली आहे. पत्रकारितेकडे कमाईचे साधन म्हणून न पाहता चिकाटी व धैर्याच्या जोरावर 'पनवेल टाइम्स'ने यशस्वी वाटचाल केली. बदलत्या परिस्थितीला सामोरे जात आपली पत्रकारिता सुरू ठेवली आहे. समाजाशी असलेली बांधिलकी जपण्याचे काम 'पनवेल टाइम्स'ने केले. संपादक गणेश कोळी यांनी पत्रकारितेचा सन्मान केला, असे त्यांनी सांगितले.

सुप्रसिद्ध लावणी कलाकार हिंदवी पाटील यांनी 'पनवेल टाइम्स'चे कार्य मोठे असून या व्यासपीठावरून सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक गोष्टी मला शिकायला मिळाल्या. यावर्षी मी नृत्यांगना म्हणून तुमच्यासमोर आले, मात्र पुढील वर्षी अभिनेत्री म्हणून येईन, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी पनवेल टाइम्सतर्फे नवा भारत विषयावर आयोजित निबंध स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. देवदत्त घरत यांच्या मार्गदर्शनाखाली कोळी-आगरी वेशभूषेतील फॅशन रनवेचे आयोजन करण्यात आले होते. यात अनेक सौंदर्यवतींनी सहभाग घेतला. त्यांनाही मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक संपादक गणेश कोळी यांनी केले, तर आभार अ‍ॅड. मनोज म्हात्रे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्ञा जाधव यांनी केले.

# 'सीकेटी'त शाळा समितीची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाची प्रथम शाळा समितीची बैठक सोमवारी (दि. २१) झाली. बैठकीसाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्यकारिणी मंडळ सदस्य वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, कार्यकारिणी मंडळ सदस्य संजय भगत, अ‍ॅड. राहुल घरत, संस्था सचिव एस.टी. गडदे, संतोष चव्हाण, नीरजा अदुरी, मंजुषा भगत, नंदकुमार देशमुख, सुवर्णा चौधरी, दर्शन ठाकूर, हर्षद पाटील, स्वाती काळे आदी उपस्थित होते.




यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या कार्याची माहिती, विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती व शैक्षणिक प्रगती, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, शाळेतील स्वच्छता, पिण्याचे पाणी, शौचालय व सुरक्षितता याबाबत उपाय, शाळेतील भौतिक सुविधा व आवश्यक शैक्षणिक साधनसामग्री, पालकांचा शाळेतील सहभाग वाढविणे, विद्यार्थ्यांच्या आरोग्य, सुरक्षा व सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजना, शाळेच्या विकासासाठी आवश्यक नियोजन आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी बोलताना संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबी आणि सोयीसुविधा यात कोणतीही तडजोड करणार नाही आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जे जे आवश्यक असेल ते सर्व करण्याचा विद्यालयाचा प्रयत्न राहील. विविध विषयांवर सदस्यांनी मते मांडली. शाळेच्या शैक्षणिक व भौतिक विकासासाठी सर्व सदस्यांनी एकमताने पाठिंबा दिला. बैठकीचे आयोजन आणि नियोजन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे यांनी केले होते.

दरम्यान, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नवनिर्वाचित मुख्याध्यापिका स्वाती काळे यांचे अभिनंदन केले तसेच विद्यालयाच्या कामकाजाची प्रगती अतिशय चांगली असल्याचे भाष्य केले. तसेच विद्यालयाच्या मुलींच्या एनसीसी विभागाच्या स्नेहा पाटील यांची एसओपदी पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.

## गणेश मंडळात झोपलेल्या दोघांचे मोबाइल लंपास

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे सेक्टर ६ येथील गणेश मंडळात झोपलेल्या दोघांच्या उशाजवळ ठेवलेले दोन मोबाइल अज्ञात चोरट्याने लंपास केले. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महेश कामठे आणि त्यांचे मित्र रमेश पोखरकर हे अ‍ॅडव्हान्स सोसायटी, सेक्टर ६, कामोठे येथील गणेश मंडळात झोपले होते. झोपण्यापूर्वी त्यांनी आपापले मोबाइल उशाजवळ ठेवले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात इसमाने सोसायटीच्या गेटमधून प्रवेश करून सुमारे ८० हजार रुपये किमतीचे दोन मोबाइल चोरून नेले. घटनेची माहिती मिळाल्यानंतर कामोठे पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.





**नवी मुंबई : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वाशीचा राजा आणि नवी मुंबईचा महागणपती यांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी नवी मुंबई महापालिकेचे उपमहापौर दशरथ भगत यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.**

## रिटघर विद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३९वा जयंती सोहळा उत्साहात साजरा झाला. यावेळी स्थानिक स्कूल कमिटी सदस्य बळीराम भोपी, राजेश भोपी, दीपक पाटील, विलास भोपी, विश्वनाथ भोपी, भारत भोपी, नवनाथ भोपी, विष्णू भगत, संजय पाटील, रमेश पाटील, मुख्याध्यापक कारंडे आर. बी., पर्यवेक्षिका बाबर तसेच सर्व शिक्षकवृंद यांच्या हस्ते कर्मवीरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

विद्यार्थिनींनी कर्मवीर स्तवन सादर केले. लेझीम, झांज पथकासह कर्मवीर अण्णांची पालखी संपूर्ण गावातून मिरवण्यात आली. पाचवीचे जीत भोपी व तेजल खारुटकर यांनी अण्णा व वहिनींची वेशभूषा केली होती.


अण्णांच्या प्रतिमेसमोर आरती करण्यात आली. राम समर्थ महिला बचत गट, रिटघर यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक प्रमुख खुटले यांनी, तर सूत्रसंचालन व आभार अमित पाटील यांनी मानले.



**कळंबोलीचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मित्र मंडळ (गणराज), कळंबोली, से. २.**

# महाराष्ट्राला समृद्ध करणाऱ्या जीवनदायिनी नद्या





महाराष्ट्राच्या भूमीला निसर्गाने जे वैभव दिले आहे त्यात नद्यांचे स्थान सर्वात उंच आहे. सह्याद्रीच्या कुशीतून उगम पावून दख्खनच्या पठाराला समृद्ध करून, कोकणच्या हिरवाईला स्पर्श करून वाहणाऱ्या या नद्या केवळ पाण्याचे प्रवाह नाहीत, तर त्या महाराष्ट्राच्या संस्कृतीचा, इतिहासाचा आणि शेतीप्रधान अर्थव्यवस्थेचा जिवंत आधार आहेत. या राज्याचा विचार नद्यांशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. उत्तरेकडील तापीपासून दक्षिणेकडील कृष्णेपर्यंत आणि पश्चिमेकडील उल्हास-वैतरणेपासून पूर्वेकडील वैनगंगा-वर्धेपर्यंत प्रत्येक नदीने आपल्या काठावर एक वेगळे जग फुलवले आहे.

यातील सर्वात मोठी आणि पवित्र मानली जाणारी नदी म्हणजे गोदावरी. तिला महाराष्ट्राची भागीरथी आणि दक्षिणेची गंगा असेही म्हटले जाते. तिचा उगम नाशिकमधील त्र्यंबकेश्वर येथे ब्रह्मगिरी पर्वतावर होतो. हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ठिकाण असल्याने उगमापासूनच तिला पावित्र्य लाभले आहे. नाशिक शहरातून वाहताना ती शहराला दोन भागात विभागते आणि पुढे कोपरगाव, पैठण, गंगाखेड, नांदेड या शहरांना स्पर्श करत पुढे जाते. पैठण हे संत एकनाथांच्या पदस्पर्शाने पावन झालेले गाव याच नदीकाठी आहे. पैठणची जगप्रसिद्ध पैठणी साडी आणि तिचे विणकर गोदावरीच्या पाण्याशी आणि संस्कृतीशी घट्ट जोडलेले आहेत. गोदावरीच्या खोऱ्यातील काळी कसदार जमीन ऊस, द्राक्ष, डाळिंब, कांदा यांसारख्या नगदी पिकांसाठी ओळखली जाते. नाशिकच्या द्राक्षबागा आणि दिंडोरीचा वाईन उद्योग याच पाण्यावर फुलला आहे. दर बारा वर्षांनी नाशिकमध्ये भरणारा कुंभमेळा गोदावरीच्या काठावरच भरतो, जिथे लाखो भाविक स्नानासाठी येतात.

गोदावरीइतकीच महत्त्वाची दुसरी मोठी नदी म्हणजे कृष्णा. तिचा उगम सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर या थंड हवेच्या ठिकाणी होतो. महाबळेश्वरमध्ये एकाच ठिकाणी पाच नद्या उगम पावतात अशी मान्यता आहे, त्यात कृष्णा प्रमुख आहे. सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांमधून वाहणारी कृष्णा प्रचंड विशाल आहे. तिच्या दोन प्रमुख उपनद्या म्हणजे कोयना आणि भीमा. कोयना नदी कोयना धरणामुळे प्रसिद्ध असली तरी तिच्या काठावरील जंगल आणि जैवविविधता अतिशय समृद्ध आहे. भीमा नदीचा उगम पुण्याजवळील भीमाशंकर येथे होतो, जे आणखी एक ज्योतिर्लिंग आहे. भीमा नदी पुढे पंढरपूरला जाते आणि तिथे तिला चंद्रभागा असे म्हटले जाते. पंढरपूरच्या विठ्ठलाच्या मंदिरासमोरून वाहणारी ही चंद्रभागा लाखो वारकऱ्यांसाठी मातेसमान आहे. आषाढी आणि कार्तिकी एकादशीला चंद्रभागेच्या वाळवंटात भरणारा मेळा हा महाराष्ट्राच्या भक्तीपरंपरेचा सर्वात मोठा सोहळा आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या अभंगातून चंद्रभागेचे वर्णन वारंवार येते.

उत्तर महाराष्ट्राचा विचार केला तर तापी नदी तिथली जीवनरेखा आहे. तापीचा उगम मध्यप्रदेशात असला तरी महाराष्ट्रातील जळगाव, धुळे, नंदुरबार या जिल्ह्यांची संपूर्ण शेती तिच्यावर आणि तिची उपनदी पूर्णावर अवलंबून आहे. तापीच्या खोऱ्यातील हवामान केळी उत्पादनासाठी अत्यंत पोषक आहे, त्यामुळे जळगावला केळीचे माहेरघर म्हटले जाते. या भागातील पांढरे सोने म्हणजे कापूस देखील याच नद्यांच्या पाण्यावर येतो.

कोकणातील नद्यांचे रूप मात्र अगदी वेगळे आहे. सह्याद्रीत उगम पावून अवघ्या काही किलोमीटर अंतरात अरबी समुद्राला मिळणाऱ्या या नद्या लहान पण अतिशय वेगवान आणि उत्साही असतात. वैतरणा, उल्हास, सावित्री, वशिष्ठी, शास्त्री, काजळी या कोकणच्या प्रमुख नद्या. पावसाळ्यात या नद्या दुथडी भरून वाहतात आणि आजूबाजूच्या धबधब्यांना आणि हिरव्यागार दऱ्यांना जन्म देतात. उल्हास नदी कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर परिसरातून वाहते तर वैतरणा नदी मुंबईसारख्या महानगराला पाणी पुरवणाऱ्या महत्त्वाच्या नद्यांपैकी एक आहे. या नद्यांच्या मुखाशी तयार झालेल्या खाड्यांमध्ये कांदळवनाची जंगले वाढली आहेत, जी समुद्राच्या भरतीपासून किनाऱ्याचे रक्षण करतात आणि मासेमारीसाठी उत्तम ठिकाण आहेत. कोकणातील हापूस आंबा, फणस, काजू यांची चव या नद्यांनी आणलेल्या गाळामुळे अधिक खुलते.

पूर्वेकडे विदर्भात गेल्यावर चित्र पुन्हा बदलते. तिथे वैनगंगा आणि वर्धा या दोन मोठ्या नद्या आहेत. नागपूर, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यांमधून वाहणारी वैनगंगा ही धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान आहे. भंडारा जिल्ह्याला धानाचे कोठार म्हटले जाते ते याच नदीमुळे. वर्धा नदीच्या काठावर संत्री आणि कापसाच्या बागा फुलल्या आहेत. या दोन्ही नद्या पुढे एकत्र येऊन प्राणहिता नदी तयार करतात जी पुढे गोदावरीला मिळते. या नद्यांच्या आजूबाजूला ताडोबा-अंधारी, नागझिरा यांसारखी घनदाट जंगले आणि व्याघ्र प्रकल्प आहेत. या जंगलातील वाघ, बिबट, हरीण यांसारख्या वन्यजीवांसाठी या नद्या म्हणजे तहान भागवण्याचे आणि जीवन जगण्याचे एकमेव साधन आहे.

महाराष्ट्रातील नद्या केवळ शेती किंवा पिण्याच्या पाण्यापुरत्या मर्यादित नाहीत. त्यांनी महाराष्ट्राची लोकसंस्कृती घडवली आहे. नदीकाठचे घाट हे केवळ आंघोळीचे ठिकाण नसून ते गावाचे सामाजिक केंद्र असते. तिथे सकाळ-संध्याकाळ लोक एकत्र येतात, गप्पा मारतात, सण साजरे करतात. पैठणचे नाथषष्ठी, पंढरपूरची वारी, कोकणातील होळी आणि गणेश विसर्जन हे सगळे सण नद्यांशिवाय अपूर्ण आहेत. लोकगीतांपासून ते आधुनिक कवितांपर्यंत नदी हा जिव्हाळ्याचा विषय राहिला आहे.

नद्या आपल्याला भरभरून देतात म्हणून त्यांच्याशी आपले नाते आई आणि लेकरासारखे असायला हवे. नदीकाठावर झाडे लावणे, पाण्याचा जपून वापर करणे, नदीचा प्रवाह मोकळा ठेवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. जेव्हा आपण नदीला आई मानतो तेव्हा तिचे रक्षण करणे हा आपला धर्म बनतो. महाराष्ट्रातील या जीवनदायिनी नद्या अशाच अविरत वाहत राहतील तरच पुढच्या पिढ्यांनाही त्यांच्या सौंदर्याचा आणि समृद्धीचा अनुभव घेता येईल.

(साभार इंटरनेट)


## संपादकीय

## मानसिकता बदल हवा

बिहारमधील त्या टोळक्याला एका कोवळ्या मुलीच्या शरीरावर आपला अधिकार वाटला हे भीषण आहे. आक्षेपार्ह वर्तन करताना त्याचे चित्रीकरणही करायचे यातून स्त्रीकडे माणूस म्हणून पाहण्याच्या संस्काराचाच त्यांच्यात अभाव दिसतो. अशा मानसिकतेला तुरुंगाची भीती कशी पुरेशी ठरणार? हे केवळ बिहारची समस्या म्हणून बाजूला कसे सारणार?

**बिहारच्या जमुई जिल्ह्यात दहावीत शिकणारी एक मुलगी व तिचा मित्र यांना रस्त्यात अडवून एका टोळक्याने केलेल्या मारहाणीचा आणि मुलीशी केलेल्या संतापजनक गैरवर्तनाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर फिरतो आहे. १९ सप्टेंबरला घडलेल्या या घटनेतील दोघेही अल्पवयीन विद्यार्थी होते. सात आरोपींची ओळख पटून तिघांना अटक केल्याचे आणि पोक्सो तसेच भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल केल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. विशेष पथकाकडून अधिक तपास केला जाणार आहे. संबंधित व्हिडिओ पाहताना कुणाही सुजाण व्यक्तीचे मन सुन्न होईल. त्या दोघांना घेरणे, असहाय्य अवस्थेतील त्या मुलीच्या शरीराला तिच्या इच्छेविरुद्ध स्पर्श करणे, तिच्या दुप्पट वयाच्या कुणा गुंडाने तिला वाट्टेल तसे उचलून धावणे हे सगळे पाहून प्रश्न पडतो की या साऱ्याचा त्या मुलीच्या मनावर काय परिणाम झाला असेल? किशोरवयात असा एखादा नकोसा स्पर्शसुद्धा अनेक दिवस अस्वस्थ करून सोडू शकतो. मग इतक्या लोकांसमोर झालेला हा अमानुष प्रकार तिच्या मनाला किती खोल जखमा करून गेला असेल? किती कठीण जाईल तिला पुन्हा आत्मविश्वासाने बाहेर वावरणे? समाजाला पुन्हा तोंड देताना लाज, संताप आणि असुरक्षितता यांचे किती ओझे तिला या कोवळ्या वयात बाळगावे लागेल? आणि त्याहून मोठा प्रश्न आहे - तिचा तो व्हिडिओ आपण अजून किती दिवस फिरवत राहणार आहोत? पीडितेचा चेहरा, तिची अवस्था आणि तिच्यावर झालेला अत्याचार पुन्हा पुन्हा लोकांच्या मोबाइलवर पोहोचणे हा तिच्यासाठी आणखी एक मानसिक छळच आहे हे लक्षात घेऊन हे थांबवण्यासाठी पावले कधी उचलणार? कायदा अशा मुलांची ओळख जपण्याबाबत स्पष्ट आहे. नाव, छायाचित्र, शाळा, पत्ता किंवा ओळख पटू शकेल अशी माहिती प्रसिद्ध करण्यास कायद्याने मनाई आहे. गुन्हेगारांना शोधून शिक्षा करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच या मुलीला या घटनेतून सावरण्यासाठी सुरक्षित आणि संवेदनशील वातावरण देणेही महत्त्वाचे आहे. पीडित मुलीला तिचे आयुष्य पुन्हा आत्मविश्वासाने जगता यावे हेही न्यायाचाच भाग आहे. या घटनेने आणखी एका मूलभूत प्रश्नाला हात घातला आहे. किशोरवयात मुला-मुलींना एकमेकांविषयी आकर्षण वाटते. शरीरात आणि मनात बदल होतात. ही निसर्गाची प्रक्रिया आहे. संमती, मर्यादा आणि जबाबदारी यांचे भान अर्थातच मुलांना असले पाहिजे. ते त्यांना समजावून सांगण्याऐवजी त्यांना गुन्हेगारासारखे वागवण्याचा किंवा रस्त्यावर धडा शिकवण्याचा अधिकार कोणालाही नाही. कामाच्या शोधात बिहारमधील पुरुष देशभर फिरतात, तेव्हा ही भीषण मानसिकताही सोबत जाऊ शकते. त्यामुळेच एका राज्यातील घटना अन्य राज्यांनीही गांभीर्याने घ्यायला हवी. तेथील पोलिस कारवाई करतील, न्यायालयाकडून दोषींना शिक्षाही मिळेल. मुलींना आपण 'कसे वागावे' हे सतत शिकवत असतोच. पण 'मुलीच्या संमतीशिवाय तिच्या शरीराला हात लावण्याचा तुला कोणताही अधिकार नाही' हे मुलांना ठामपणे कधी शिकवणार आहोत? खरा बदल त्यातूनच सुरू होऊ शकतो.**

# स्वातंत्र्यसैनिक युसूफ मेहेर अली



### निमित्त

युसूफ मेहर अली यांचे मूळ नाव युसूफ झफर मर्चंट. हे भारतीय स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांचे कुटुंब मूळ गुजरातच्या कच्छ भागातील होते. मेहरअली यांच्या आजोबांचा मुंबईमध्ये कापडाचा व्यवसाय होता. मेहरअली फार कमी वयात भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सामील झाले. तरुण वयात ते ब्रिटिश सरकारच्या गुलामगिरी विरोधात रस्त्यावर उतरले. कॉलेजमध्ये असताना ते बॉम्बे प्रेसीडेंसी युथ लिग संघटनेत सामील झाले. ते सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक सदस्यापैकी एक होते. त्यांनी १९४२च्या चले जाव आंदोलनात महत्त्वाची भूमिका राबवली होती. 'चले जाव' ही घोषणादेखील त्यांनीच दिली होती. आज युसूफ मेहर अली यांचा जन्मदिन (२३ सप्टेंबर १९०३) आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून.

युसूफ मेहर अली, भारतातील युवक चळवळीचे नेते, उत्तम वक्ते व स्वातंत्र्य चळवळीतील एक क्रांतिकारक. त्यांचे खोजा मुस्लिम कुटुंब मूळचे गुजरातच्या कच्छ संस्थानातील. त्यांचे वडील व्यापारानिमित्त मुंबई व कलकत्ता या शहरांत राहत. यूसुफ यांचा जन्म मुंबईत झाला, पण त्यांचे प्राथमिक शिक्षण कलकत्यात झाले. नंतर त्यांनी सर्व शिक्षण मुंबईतच घेतले. विद्यार्थि दशेतच रस्पूट्यीन क्लब नावाची युवक संघटना मिनू मसानी, उपेंद्र देसाई, के एफ. नरिमन आदी मित्रांच्या साह्याने त्यांनी स्थापन केली. एल्फिन्स्टन महाविद्यालयातून (मुंबई विद्यापीठ) त्यांनी पदवी घेतली (१९२५). त्यानंतर ते एलएलबी झाले पण त्यांच्या युवक चळवळीमुळे त्यांना वकिलीची सनद नाकारण्यात आली. तेव्हा त्यांनी आ. रा. भटांच्या मदतीने बॉँम्बे यूथलीगची स्थापना केली (१९२८). पुढे तिचेच रूपांतर बॉम्बे प्रसिडेन्सी यूथ लीगमध्ये झाले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तत्त्वांवर यूथ लीगची श्रद्धा होती. लीगच्या निवडक चारशे स्वयंसेवकांनी मेहरअलींच्या नेतृत्वाखाली मुंबई बंदरात सायमन कमिशनविरुद्ध निदर्शने केली. त्यात मेहरअलींना मार बसला. १९२९ मध्ये त्यांनी लष्कराच्या धर्तीवर नॅशनल मिलिशा नावाची सैनिकीसम संघटना स्थापन केली. या संघटनेचे ध्येय लोकांना शिक्षित करून स्वातंत्र्याची जाणीव करून द्यावयाची आणि नंतर त्यांना कृतीसाठी उद्युक्त करावयाचे, हे होते. या सामाजिक प्रबोधनासाठी त्यांनी चर्चासत्रे, बौद्धिके आयोजित केली आणि व्याख्याने दिली.

कलकत्त्याच्या अखिल भारतीय युवक काँग्रेसचे ते महासचिव झाले. बार्डोलीचा साराबंदी सत्याग्रह, मिठाचा सत्याग्रह आदींतून त्यांनी सक्रिय भाग घेतला. महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीनंतर त्यांनी स्वदेशी वस्तूंचा सर्वत्र प्रसार केला आणि मुंबईत स्वदेशी वस्तू विकल्या. भूमिगत राहून त्यांना जनजागृती करावयाची होती पण ते सापडले व त्यांना शिक्षा झाली. तुरुंगातील वातावरणात त्यांची प्रकृती अधिक क्षीण झाली. पुढे उपचारार्थ ते अमेरिकेला गेले (१९४७) पण फारसा उपयोग झाला नाही. अखेर ऐन उमेदीतच ते मुंबई येथे मरण पावले. २ जुलै, १९५० रोजी वयाच्या ४७व्या वर्षी त्यांचे निधन झाले. पनवेल येथील तारा येथे त्यांच्या नावे युसूफ मेहेर अली सेंटर चालवले जाते.

स्वातंत्र्य चळवळीत गुंतलेले असूनही त्यांनी तरुणांसाठी विचारप्रवर्तक लेखन केले. वृत्तपत्रांतील स्फुटलेखनाशिवाय त्यांनी लीडर्स ऑफ इंडिया (दोन खंड-१९४२), ए ट्रिप टू पाकिस्तान (१९४३), द मॉडर्न वर्ल्ड (१९४५), द प्राइस ऑफ लिबर्टी (१९४८) इ. पुस्तके लिहिली. ते आजन्म अविवाहित राहिले. आणि सर्व जीवन त्यांनी देशासाठी वाहिले. ते नास्तिक होते. अनेक पारशी व हिंदू त्यांचे सच्चे मित्र होते. मुंबईच्या कामगार चळवळीतील व भारतीय युवक संघटनेतील त्यांचा वाटा संस्मरणीय आहे.

(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा





## बदलते तंत्रज्ञान

## यूट्यूब चॅनेलला ठेवा सुरक्षित; होणार नाही हॅक!

जर तुमच्या यूट्यूब चॅनेलचेसुद्धा लाखो सबस्क्राइबर्स असतील किंवा भविष्यात तुम्हाला यूट्युबच्या माध्यमातून तुमचे करिअर चालू करायचे असेल तर तुम्हाला जास्त सावध राहण्याची गरज आहे. हॅकर्स अनेकदा नवीन आणि जुन्या चॅनलला लक्ष्य करतात. एकदा तुमचे यूट्यूब खाते हॅक झाल्यानंतर तुम्ही तुमच्या चॅनलमध्ये प्रवेश करू शकणार नाही.




हॅकर्स तुमचे यूट्यूब चॅनल कंट्रोल करू शकतात तसेच ते विकू किंवा जाहिरात कमाईसाठी वापरू शकतात. जर तुमचे युट्युब चॅनल कधी हॅक झालेच तर तुम्ही काय केले पाहिजे? याबद्दल आपण सविस्तर माहिती घेऊयात.

जर तुमचे यूट्यूब अकाउंट हॅक झाले तर तुमच्यासमोर दोन परिस्थिती निर्माण होतील. पहिल्या प्रकरणात तुम्ही तुमचे चॅनल लॉग इन करू शकाल आणि दुसऱ्या प्रकरणात तुम्ही लॉग इन करू शकणार नाही. दोन्ही परिस्थितींमध्ये काय करावे याबद्दल अधिक माहिती जाणून घेऊया.

जर तुमचे अकाउंट हॅक झाल्यानंतरही लॉग इन होतं असेल, तर तुम्हाला सर्वप्रथम तुमचा पासवर्ड बदलणे आणि सर्व डिव्हाइसेसवरून अकाउंट लॉगआउट करणे आवश्यक आहे. चला याबद्दल स्टेप बाय स्टेप माहिती घेऊयात.


**अकाऊंटचा पासवर्ड कसा बदलायचा?**

सर्वप्रथम तुम्हाला ब्राउझरमध्ये गुगल अकाउंट लॉग इन करावे लागेल. गुगल प्रोफाइल फोटोवर क्लिक करून, तुम्हाला मॅनेज युवर गुगल अकाउंटवर टॅप करावे लागेल. येथे तुम्हाला सिक्युरिटीवर टॅप करा आणि गुगलवर साइन इन करा. येथे पासवर्ड पर्याय निवडल्यानंतर, तुम्हाला तुमचा नवीन पासवर्ड टाकावा लागेल. स्ट्राँग पासवर्ड ठेवण्याचा प्रयत्न करा.

**सर्व डिवाइसमधून लॉगआउट कसे करावे?**

सर्वप्रथम तुमचे गुगल अकाउंट लॉग इन करा. गुगल प्रोफाइल चिन्हावर क्लिक करा आणि मॅनेज युवर गुगल अकाउंटवर जा. येथे तुम्ही सिक्युरिटी आणि युवर डिव्हायसेस या पर्यायावर टॅप कराल. युवर डिव्हाइसेस पर्यायाच्या अंतर्गत, तुम्हाला सर्व डिव्हाइसेसची सूची मिळेल ज्यामध्ये तुमचे अकाउंट लॉग इन आहे. येथून जी डिवाइस तुम्हाला नसेल ती रिमूव्ह करा.


जेव्हा तुम्ही तुमचे यूट्यूब चॅनेल लॉग इन करू शकत नाही, तेव्हा तुमच्यासाठी यूट्यूब अकाउंट रिकवरी प्रोसेस हा एकमेव पर्याय उरतो.



## आरोग्य प्रहर

## छातीत जळजळ होण्यामागे 'हे' असू शकते कारण...

चांगल्या पाचन क्रियेमुळे प्रकृती तंदुरुस्त राहते. खराब पाचन क्रियेमुळे संपूर्ण आरोग्यावर वाईट परिणाम होतो. ज्यावेळी खाणं व्यवस्थित पचत नाही, त्यावेळी पोषक तत्व सुद्धा शरीराला पूर्णपणे मिळत नाहीत. खराब पाचनक्रियामुळे आरोग्यासंबंधी अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. काही लोकांना सतत एसिडिटी होत असते. त्यामुळे आंबट ढेकर, छातीत जळजळ अशा समस्या निर्माण होतात. जर, नेहमीच असा त्रास होत असेल, तर काही गोष्टींमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.



पोटात आधीपासून एसिड असतं. खाण पचवण्यात हे एसिड मदत करतं. पण काही चुकांमुळे शरीरातील एसिडच प्रमाण वाढतं. त्यामुळे छातीत जळजळ, आंबट ढेकर येऊ लागतात. काहीवेळा औषधांच सेवन आणि प्रेग्नेंसीमुळे सुद्धा एसिडिटी होऊ शकते. जर एसिडिटी सतत होत असेल, तर यामागे काय कॉमन कारण आहे ते जाणून घ्या.

**ॲसिडिटी का चाळवते?**

जे काही आपण खातो ते पचवण्यासाठी फिजिकल एक्टिविटी आवश्यक आहे. जर जेवल्यानंतर तुम्हाला बसून राहण्याची किंवा झोपून जाण्याची सवय असेल, तर त्यामुळे सुद्धा एसिडिटी चाळवू शकते.

**रात्री जेवल्यानंतर काय टाळलं पाहिजे?**

जेवल्यानंतर तुम्ही लगेच चहा-कॉफी पीत असाल, तर एसिड रिफलेक्सची समस्या निर्माण होऊ शकते. खासकरुन रात्री जेवल्यानंतर चहा-पाणी पिणं टाळा. अन्यथा अडचण येऊ शकते.

**एसिड रिफलक्स**

रात्री एसिड रिफलक्स होण्यामागे दोन कारणं असू शकतात. एक उशिरा जेवण त्यानंतर लगेच झोपणं. दुसरं चुकीच्या पोजीशनमध्ये झोपणं. रात्री पोटावर झोपल्यास एसिड रिफलक्सचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे छातीत जळजळ होऊ शकते.

**का वाढते ॲसिडिटी?**

खाण्यापिण्याच्या सवयी बदलल्या आहेत. त्याचा थेट परिणाम पचनावर होतो. जास्त जंक फूड, मसालेदार तळलेलं खाणं, जास्त चहा-कॉफीचे सेवन अशा गोष्टींमुळेसुद्धा ॲसिडिटी वाढते.

# श्रीवर्धन समुद्रकिनारी अत्याधुनिक इको टॉयलेट

## कचरा प्रक्रिया करणारी सिस्टीम अद्यापही बंद



**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती असलेल्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावरती श्रीवर्धन नगर परिषदेच्या माध्यमातून इको टॉयलेटची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदर इको टॉयलेटचे लोकार्पण झाल्यानंतर काही दिवसांनी हे टॉयलेट सुरू करण्यात आले आहेत. सदरचे टॉयलेट हे पूर्णपणे स्वयंचलित असून धुपप्रतिबंधक बंधाऱ्यावरील अन्य परिसरात देखील इको टॉयलेट बाबत माहिती देणारे सूचनाफलक असणे गरजेचे आहे. कारण अनेक वेळा अनेक पर्यटक अद्यापही या ठिकाणी स्वच्छतागृह कोणत्या ठिकाणी उपलब्ध आहे? असे स्थानिक नागरिकांना विचारताना आढळून येतात. वीज पुरवठा खंडित झाला असेल, तर हे इको टॉयलेट चालतात का? याबाबत देखील पर्यटकांना माहिती देणे गरजेचे आहे.

इको टॉयलेटमध्ये प्रवेश करण्यासाठी नागरिकांना पाच रुपयाचे किंवा दहा रुपयाचे कॉईन त्या ठिकाणी असलेल्या बॉक्समध्ये टाकावे लागते. या बॉक्समध्ये कॉईन गेल्यानंतर या टॉयलेटचा दरवाजा ऑटोमॅटिक पद्धतीने उघडला जातो. आत मधील वीज पुरवठा व पंखे देखील सुरू होतात. त्यानंतर टॉयलेट मधून बाहेर आल्यानंतर पुन्हा आत मध्ये प्रवेश करण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीला कॉइन टाकल्यानंतरच दरवाजा उघडला जातो. या ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्यानंतरदेखील सदर टॉयलेटची यंत्रणा सुरू असणार आहे का? याबाबतची माहिती देखील त्या ठिकाणी उपलब्ध असणे गरजेचे आहे. टॉयलेट कसा वापरावा याच्या सूचना टॉयलेटच्या दरवाजावरती मराठीमध्ये लिहिलेल्या आहेत. अशाच प्रकारचे सूचनाफलक समुद्रकिनाऱ्यावरती दोन ते तीन ठिकाणी लावणे गरजेचे आहे.

मठाच्या स्मशानभूमीकडे जाणाऱ्या मार्गावरती बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहाच्या बाजूला कचऱ्याची प्रक्रिया करण्यासाठी एक टाकी बनवण्यात आली आहे. व या टाकी वरती दोन यंत्रे बसवण्यात आली आहेत. यामध्ये सुका कचरा व ओला कचरा अशा प्रकारची ती दोन यंत्रे आहेत, मात्र ही सिस्टीम अद्याप पर्यंत सुरू करण्यात आलेली नाही.

## ट्रेलरचा अपघात; चालकाचा मृत्यू

**खोपोली :** पुणे कडून मुंबईच्या दिशेने निघालेला कंटेनर – ट्रेलर वरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने महामार्गाच्या बाजूस असलेल्या अमृतांजन पूला खालील अरूंद जागेमध्ये ट्रेलर घुसला. देवदूत यंत्रणा, आय आर बी पेट्रोलिंग, डेल्टा फोर्स आणि महामार्ग वाहतूक पोलीस यंत्रणा बोरघाट यांच्या प्रयत्नाने चालकाला बाहेर काढण्यात यश आले, मात्र चालकाचा रुग्णालयात मृत्यू झाला .


### जाहीर नोटीस

जाहीराती मध्ये नमुद सोसायट्री ग्रीनवूड फेज वन को. ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी.. कानपोली हेदुटाणे या सोसायटी मध्ये इमारतीच्या डग वरती जिआय पत्र्याच्या शेडचे काम करायचे आहे तरी ईच्छुक ठेकेदारानी आपली निविदा २६/०९/२०२६ पर्यंत सोसायटीच्या खालील दिलेल्या ईमेल आयडी वरती मेल करण्यात यावी..

**सोसायटी मेल आयडी** greenwoodsocietyphase१@gmail.com


# अतुल झेंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आदिवासीवाडी शाळेला वॉटर प्युरिफायर

**माणगाव : बातमीदार**

ठाणे–कल्याण येथे पोलिस उपायुक्त (DCP) म्हणून कार्यरत असलेले कार्यक्षम पोलिस अधिकारी अतुल झेंडे यांच्या ४१व्या वाढदिवसानिमित्त मंगळवार, दि. २२ सप्टेंबर रोजी सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

साजे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा वांगणेवाडी गावचे सुपुत्र आणि सामाजिक कार्यकर्ते नीलेश वांजळे यांनी रायगड जिल्हा परिषद शाळा, साजे आदिवासीवाडी येथील विद्यार्थ्यांसाठी शुद्ध व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन शाळेला पाणी वॉटर प्युरिफायर भेट स्वरूपात दिले.

अतुल झेंडे यांच्या वाढदिवसानिमित्त योग्य ठिकाणी योग्य मदत करण्याच्या उद्देशाने हा सामाजिक उपक्रम राबविल्याचे नीलेश वांजळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने देण्यात आलेल्या या वॉटर प्युरिफायरमुळे विद्यार्थ्यांना मोठा लाभ होणार आहे.

यावेळी रायगड जिल्हा परिषद शाळा साजे आदिवासीवाडी येथील सर्व विद्यार्थ्यांनी अतुल झेंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेला वॉटर प्युरिफायर उपलब्ध करून दिल्याबद्दल विद्यार्थी, शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती तसेच पालकांच्यावतीने नीलेश वांजळे यांचे आभार व्यक्त करण्यात आले.




### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क – हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **७ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन
मौजे – खानाव, ता. पनवेल, जि. रायगड.

| सर्व्हे नंबर / गट क्रमांक | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. चौ. मी. | आकार रू. पैसे | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ७९ | ४/अ | ० – ३४ – ००<br>पो. ख. ० – ०२ – ८० | ७.१० | १) श्री. रणजित हरिश्चंद्र जोशी<br>२) श्री. जयेंद्र हरिश्चंद्र जोशी |
| | एकूण | ० – ३६ – ८० | | |

वरील मिळकतीचे **एकूण क्षेत्रफळ ० – ३६ – ८० हे. आर. चौ. मी, आकार ७.१० रू. पैस** पैकी लिहून देणार यांचे अविभाज्य हिश्याचे पूर्ण विक्री **क्षेत्र ० – १६ – ०० हे. आर. चौ. मी., आकार ३.३४ रू. पैसे** या मिळकतीची.

पनवेल.
दिनांकः २२/०९/२०२६.

सही/–
जयवंत एकनाथ भोपी
ॲडव्होकेट
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स,
प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर,
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. नंबर ९०२२३१७७७२



सिडको
शहरांचे शिल्पकार

### नोटीस–१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण "ना हरकत पत्र" मागणी अर्जानुसार नोटीस डॉ. शैलेश बाबाराम सुर्वे, राहणार – २७०१/०४, ओडीसी–२, ऑर्चर्ड अव्हेन्यू, हिरानंदानी गार्डन, पवई, मुंबई– ४०००७६ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे १) दर्शन लालजी चौधरी २) पंकज भुराभाई पटेल ३) वसंत देवजी पटेल यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता "ना हरकत प्रमाणपत्रासाठी" अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ठ भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ४२५२ | १०/९/२०२६ | पुष्पक नोड | २८ | ६७ | ४२०.०० चौ.मी. | १०/४/२०२६ | २०/४/२०२६<br>२४/४/२०२६ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२३४/२०२६–२७



MAHAVITARAN

### Tender Notice

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/GRN/FUSE WIRE/T-08/2026-27 | Contract for Supply OF Tinned Copper Fuse Wire of various ratings | 2.00 | 2,000/- | 500+18% GST= 590/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Dt. 23.09.2026 to Dt. 30.09.2026. Submission of Bid is up to Dt. 01.10.2026 till 18.15 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Dy. Executive Engineer Tel No. 9029145594. M.S.E.D.Co.Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.- Raigad-402103.

PRO no. 098

**Executive Engineer,**
**Goregaon Division**


# जात प्रमाणपत्र पडताळणीतील त्रुटींच्या पूर्ततेसाठी विशेष शिबिर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

'सेवा संकल्प अभियान' कालावधीत इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील प्रवेशित विद्यार्थी तसेच सन २०२६–२७ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रलंबित प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेऊन आपल्या प्रकरणातील त्रुटींची पूर्तता करावी, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, रायगड जयंत चाचरकर यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अनुषंगाने जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, रायगडमार्फत विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे. समितीस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणांमधील आवश्यक कागदपत्रे व अन्य त्रुटींची पूर्तता करून प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी विद्यार्थ्यांना या शिबिराच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेत प्रवेशित विद्यार्थी तसेच सन २०२६–२७ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणारे अनुसूचित जाती, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग, इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी या विशेष शिबिराचा लाभ घेऊ शकतात.

दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत हे विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे.शिबिराचे ठिकाण जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, १४०२ अ, प्लॉट नं. ९, स. नं. ७६/२ ब, सेंट मेरीज कॉन्व्हेंट स्कूल मागे, चेंढरे, अलिबाग येथे आहे.




**खोपोली : कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांनी खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी शिवसेना शहराध्यक्ष लक्ष्मण रिठे, माजी शहराध्यक्ष संदीप पाटील, नगरसेवक हरीश काळे, दिनेश थोरवे,सोनू शेलार, केतन शेंडे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.**


### ग्रुप ग्रामपंचायत वडगांव
**कार्यालय : मु. वाशीवली, पो. पातळगंगा, ता. खालापूर, जि. रायगड**

### निविदा सुचना

ग्रुप ग्रामपंचायत वडगांव ता. खालापूर जि. रायगड हद्दीत ग्रामनिधीअंतर्गत सन २०२६/२७ करिता खालीलप्रमाणे कामे मा. उपअभियंता (बांध) उपविभाग कर्जत व मा. कार्यकारीअभियता (बाध.) विभाग अलिबाग याचेकडील मंजुर अंदाजपत्रकाप्रमाणे नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांकडून निविदा मागविणेत येत आहे. तरी इच्छुक ठेकेदाराकडून टक्केवारी दराने आपली सीलबंद निविदा दिनांक २३/०९/२०२६ त ३०/०९/२०२६ या कालावधीत सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारणेत येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फि | इसारा रक्कम | फंड | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे बोरिवली येथे श्री. बाळाराम दुर्गे ते सखाराम शिर्के ते वामन मुंढे यांचे चालीपर्यंत गटार दुरुस्ती करणे | २.९९५००/– | १००/– | ३०००/– | ग्रामनिधी | १/१०/२०२६ |
| २ | मौजेःबोरिवली येथे अंतर्गत गटारासह रस्ता दुरूस्ती करणे | ४,९९५००/– | १००/– | ५०००/– | ग्रामनिधी | १/१०/२०२६ |
| ३ | मौजे बोरिवली येथे श्री काशिनाथ नामदेव महाडिक याचे घरापासुन नाल्यापर्यंत गटार दुरूस्ती करणे. | ३०००००/– | १००/– | ३०००/– | ग्रामनिधी | १/१०/२०२६ |
| ४ | मौजे बोरिवली येथे स्मशानभुमी शेड बाधकाम करणे, | ५९९७३२/– | १००/– | ६०००/– | ग्रामनिधी | १/१०/२०२६ |
| ५ | मौजे वडगाव येथे मुख्य रस्ता ते श्री तुळशीराम गडगे याचे घरापर्यंत रस्ता करणे, | ३,९८५००/– | १००/– | ४०००/– | ग्रामनिधी | १/१०/२०२६ |
| ६ | मौजे वडगाव कातकरीवाडी विहिर ते नारायण जाधव याचे घरापर्यंत गटार दुरूस्ती करणे. | ८९८३६०/– | १००/– | ९०००/– | ग्रामनिधी | १/१०/२०२६ |
| ७ | मोजे वाशिवली येथे अंतर्गत रस्त्यासह गटार दुरुस्ती करणे. | ५.३१६७९/– | १००/– | ५४००/– | ग्रामनिधी | १/१०/२०२६ |
| ८ | मोजे कैरे येथे पदमाकर पाटील चाळ ते मेन गटारापर्यंत गटार दुरूस्ती करणे. | ४.९९८८८/– | १००/– | ५०००/– | ग्रामनिधी | १/१०/२०२६ |
| ९ | मौजेः कैरे शिवाजी नगर येथे अतर्गत रस्ता करणे. | ४,९८५००/– | १००/– | ५०००/– | ग्रामनिधी | १/१०/२०२६ |
| १० | मौजेःतळवली बौध्दवाडा येथे अंतर्गत गटार बाधकाम करणे, | ४,०००००/– | १००/– | ४०००/– | ग्रामनिधी | १/१०/२०२६ |
| ११ | मौजेःतळवली दाडवाडी व माणिकनगर येथे अंतर्गत रस्त्यासह गटार बाधकाम करणे | ३७५०००/– | १००/– | ३७५०/– | ग्रामनिधी | १/१०/२०२६ |
| १२ | मौजे तळवली दाडवाडी अतर्गत रस्ता दुरुस्ती करणे. | ३०००००/– | १००/– | ३०००/– | ग्रामनिधी | १/१०/२०२६ |
| १३ | मौजेः तळवली दाडवाडी स्मशानभुमीपर्यंत नवीन रस्ता करणे, | ४,९९८००/– | १००/– | ५०००/– | ग्रामनिधी | १/१०/२०२६ |

**अटी व शशी खालीलपमाणे:**
१) सदर कामाबाबत सविस्तर माहिती ग्रामपचायत कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध होईल
२) निविदेसोबत इसारा रक्कम भरणा केल्याची पावती, आधारकार्ड, पॅनकार्ड, झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.
३) मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
४) शासकीय नियमाप्रमाणे आयकर, वस्तु व सेवा कराचे (GST) रक्मा क्मात करणेत येतील
५) बिलाचे एकूण रकमेपैकी ५ टक्के रक्कम ही काम पूर्ण झाल्याच्या दिनांकापासुन बारा महिने कालावधीसाठी सुरक्षा अनामत म्हणून कपात करणेत येईल.
६) निविदेत सादर केलेले दर हे जी.एस.टी सहीत असावेत.
७) कोणतीही एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा पुन्हा निविदा मागविण्याचा अधिकार तसेच निविदा सुचनेत बदल करणेचा अधिकार ग्रुप ग्रामपंचायत वडगांवने राखुन ठेवलेला आहे.
८) अंदाजपत्रकात ठरवून दिलेल्या तपशीलाप्रमाणे साहित्य वापर करणे बंधनकारक राहील.
९) काही अपरिहार्य कारणास्तव बिलाची रम अदा करण्यास विलंब झाल्यास या कार्यालयास कोणताही दावा करता येणार नाही.
१०) पुर्ण करणेत आलेल्या कामाची किमान एकवर्ष विनामुल्य देखभाल व दुरूस्ती करण्याची जबाबदारी ठेकेदारावर राहील
११) अटी व शर्तीचा करारनामा रु.५००/– स्टॅप पेपरवर करून दयावा लागेल.

जा.क्र. २६५
दिनांक २२/०९/२०२६

सही/–
श्री. सुहास विष्णु वारे
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

सही/–
श्री. विनोद चांदोरकर
प्रशासक
ग्रुप ग्रामपंचायत वडगांव



### पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जिल्हा–रायगड, पनवेल ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२– २७४५८०४०/४१/४२ आयुक्त कार्यालय : ०२२– २७४५२३३९
ई–मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईटः www.panvelcorporation.com

जा.क्र.पमनपा/सा.बां. (श.अ.)/२४२६/प्र.क्र. ०२/३९०/२०२६ दिनांक–२२/०९/२०२६

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता अंदाजपत्रक तयार करण्यासाठी खालील कामासाठी दरपत्रक (Market Rate) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील तळोजा येथील प्लॉट–६,सेक्टर–१५ येथील गार्डन भुखंडामध्ये क्रिडा संकुल तयार करणे | दिनांक २३/०९/२०२६ ते २९/०९/२०२६ (७ दिवस) |

या कामाच्या दरपत्रकाबाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या https:/ www.panvelcorporation.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २३/०९/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. सदर बाबींचे बाजार भाव स्वतःच्या लेटरहेडवर महानगरपालिका कार्यालयात अथवा pmcdeputyengineer२०२४@gmail.com व panvelcorporation@gmail.com या ई–मेलवर मुदतीत पाठवण्यात यावी ही विनंती. सदर दर हे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आहेत. ही कृपया नोंद घ्यावी.

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२६/
प्र.क्र.३०३/३२५/२०२६

सही/–
शहर अभियंता
पनवेल महानगरपालिका



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S.(O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-20/26-27/ Rfx No. 7000041518 | Replacement of old NIFPS cabinet of ICT 1 & ICT 2 (P&F) CTR make at 400 kV Nagothane s/s under 400 kV RS O&M Division Nagothane Under EHV O&M Circle, Panvel..**2nd call** | Rs. 24,94,520/- | 30.09.2026 up to 23.59 hrs. |

**EMD 1% of estimate cost i.e. Rs. 24,945.20/-** and **Tender fee** Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** Mitesh Goyal (DY.EE) Mob No. 9461456635 Email ID: ee7230@mahatransco.in **Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

# सेवा सेतू, संकल्प अभियानाला प्रारंभ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक आणि घटनात्मक पदावरील कार्यकाळास २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने वीजग्राहकांना अधिक वेगवान आणि सुलभ सेवा देण्यासाठी महावितरणकडून प्रत्येक तालुक्यात विशेष सेवा कक्ष उभारून येत्या १७ ऑक्टोबरपर्यंत सेवा सेतू आणि सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे.




या दोन्ही अभियानांचा एकाच छताखाली लाभ घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी १७ सप्टेंबरपासून या अभियानांना प्रारंभ झाला आहे. संचालक धनंजय औंढेकर (संचालन) आणि राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मंगळवारी (दि. २२) अंमलबजावणीचा आढावा घेतला आणि अभियान अधिक गतिमान करण्याच्या आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी कार्यकारी संचालक (मानव संसाधन) परेश भागवत यांनी सदर लोकोपयोगी अभियानाची सविस्तर माहिती दिली. सेवा संकल्प अभियानांतर्गत प्रत्येक तालुक्यात विशेष सेवा कक्ष सुरू करण्यात आले आहेत.

पीएम सूर्यघर मोफत वीज योजना, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट) योजना, मागेल त्याला सौर कृषीपंप योजना आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० याबाबत जागेवरच ऑनलाइन अर्ज नोंदणी, योजनेचे आर्थिक फायदे आणि सौर संच बसविण्याची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

आवश्यक कागदपत्रे, कर्ज सुविधा, अंदाजित खर्च या बाबींसाठी आता स्थानिक बँक प्रतिनिधी आणि निवड सूचीवरील सौर कंत्राटदार प्रतिनिधींशी थेट संपर्क आणि समन्वय साधला जात आहे. दरम्यान, सौर योजनांची माहिती देण्यासाठी प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आला असून, त्रुटींची पूर्तता करून प्रलंबित अर्जांवर त्वरित कार्यवाही केली जात आहे. सेवा सेतू अभियानात नवीन घरगुती वीजजोडणी देणे, नादुरुस्त रोहित्र विनाविलंब बदलून देणे, वीज बिलावरील नावात बदल, मंजूर भार बदलणे, बिलिंगविषयक तक्रारींचे निवारण, प्रलंबित तक्रारी सोडविणे तसेच विद्युत सुरक्षेसाठी वीज यंत्रणेत आवश्यकतेनुसार स्पेसर बसविणे, इतर तांत्रिक उपाययोजना, वीजयंत्रणेची देखभाल आणि दुरुस्ती आदी कामांना वेग देण्याचे निर्देश क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आले आहेत.

दरम्यान, आता या अभियानामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील वीजग्राहकांचे वारंवार कार्यालयांचे हेलपाटे वाचणार असून त्यांना वेळेत सेवा मिळणार आहे. विशेषतः शेतकऱ्यांना दिवसा सिंचनासाठी वीज, सौर कृषी पंप आणि सौर वाहिनी योजनांमुळे आता मोठा दिलासा मिळणार आहे. यामुळे आता घरगुती ग्राहकांना वीजबिलात बचत आणि अतिरिक्त वीज विक्रीतून उत्पन्नाची संधीदेखील मिळणार आहे. प्रलंबित अर्ज, तक्रारींचा जागेवर निपटारा होणार असल्याने ग्राहकांचा विश्वास अजून वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर सदर अभियानाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणच्या अधिकाऱ्यांनी वीज ग्राहकांना केले आहे. दरम्यान, या अभियानामुळे वीज ग्राहकांना नक्कीच मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# नवी मुंबई प्रतिभावंतांचे शहर म्हणून उदयास येईल -महापौर सुजाता पाटील



**नवी मुंबई : बातमीदार**

जिंकल्याचा निश्चित अभिमान बाळगा पण त्याचा गर्व करू नका आणि पराभवाने खचून न जाता पुन्हा नव्या जोमाने तयारी करा, उद्याचा दिवस तुमचाच असेल, अशा प्रेरणादायी शब्दांत मनोगत व्यक्त करीत महापौर सुजाता पाटील यांनी नवी मुंबईतील विद्यार्थ्यांमध्ये अतिशय उत्तम गुणवत्ता असून हे शहर प्रतिभावंतांचे शहर म्हणून उदयास येईल, असा विश्वास व्यक्त केला. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि जिल्हा क्रीडा परिषद, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नवी मुंबई जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२६-२७ च्या शुभारंभप्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी स्थायी समितीचे सभापती अशोक पाटील, क्रीडा, सांस्कृतिक व युवक कल्याण समितीचे सभापती गिरीश म्हात्रे व उपसभापती रॉबिन मढवी, नगरसेवक निशांत भगत व श्रेया जिरगे, क्रीडा विभागाच्या उपायुक्त अभिलाषा म्हात्रे व क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, शालेय क्रीडा स्पर्धा समिती सदस्य धनंजय वनमाळी, महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ असोसिएशनचे सहसचिव दीपक तांडेल, झेनिथ इंटरनॅशनल स्कूलचे चेअरमन अवनीश सिंग, मुख्य कार्यकारी अधिकारी धनश्री आंगणे, विश्वस्त आशिष सिंग, प्राचार्य रुबी वर्गीस आदी मान्यवर उपस्थित होते.

स्थायी समितीचे सभापती अशोक पाटील यांनी नवी मुंबईतील जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये २५०हून अधिक शाळांतील ४० हजारांहून अधिक विद्यार्थी सहभागी होत असल्याबद्दल तसेच इतक्या मोठ्या प्रमाणात खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. क्रीडा समितीचे सभापती गिरीश म्हात्रे यांनी याप्रसंगी बोलताना नवी मुंबई महानगरपालिकेला सन २००९ पासून जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याची मान्यता प्राप्त झाली असून मागील १६ वर्षांपासून महानगरपालिकेमार्फत या स्पर्धांचे सातत्याने आयोजन करण्यात येत असल्याचे सांगितले. या स्पर्धांमध्ये अनुदानित ४९ क्रीडा प्रकार तसेच विनाअनुदानित ४८ क्रीडा प्रकार अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात येतो व या माध्यमातून नवी मुंबईतील शालेय विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देणे, त्यांच्यातील सुप्त क्रीडागुणांना वाव देणे आणि त्यांना जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध करून देणे हा उद्देश मोठ्या प्रमाणात साध्य होत असल्याचे त्यांनी सांगितले.

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील नवी मुंबई जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ महापौर सुजाता पाटील यांच्या हस्ते जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेने झाला. या स्पर्धेत १४ वर्षांखालील, १७ वर्षांखालील व १९ वर्षांखालील मुले व मुली अशा विविध वयोगटांचा समावेश असून ८००हून अधिक मुली व ८५०हून अधिक मुले असे एकूण १,६५०हून अधिक विद्यार्थी बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी झाले असून यामधील विजेत्यांना थेट विभागीय स्तरावरील स्पर्धेत सहभागी होता येणार आहे.

# एसआयआर मोहिमेत दावे-हरकतींना मुदतवाढ

**नवी मुंबई : बातमीदार**

मतदार याद्या अधिक अद्ययावत, अचूक आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाच्या वतीने विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत सुधारित प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली असून त्यावर नागरिकांना ३० सप्टेंबरपर्यंत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत.



एसआयआर मोहिमेंतर्गत ३१ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानंतर ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबरदरम्यान दावे व हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. प्राप्त दावे व हरकतींची २९ ऑक्टोबरपर्यंत छाननी करून निकाली काढण्यात येणार असून ४ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. मतदार यादीत नाव नोंदविणे, नाव वगळणे अथवा तपशीलात दुरुस्ती करण्यासाठी निवडणूक आयोगाने विविध अर्जांचे नमुने उपलब्ध करून दिले आहेत. नमुना ६ हा मतदार यादीत नवीन नाव समाविष्ट करण्यासाठी, नमुना ७ हा चुकीचे अथवा दुबार नाव असल्यास हरकत घेण्यासाठी किंवा नाव वगळण्यासाठी, तर नमुना ८ हा नाव, वय, पत्ता, छायाचित्र आदी मतदार यादीतील तपशीलात दुरुस्ती करण्यासाठी आहे.

नागरिकांना दावे व हरकती मतदार नोंदणी अधिकारी किंवा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष अर्ज करून दाखल करता येतील तसेच ऑनलाइन अर्जाचीही सुविधा उपलब्ध आहे. नवी मुंबईतील मतदारांनी आपल्या नावाची तसेच मतदार यादीतील इतर तपशीलांची पडताळणी करून आवश्यक असल्यास दुरुस्ती करावी. पात्र नागरिकांनी विशेषतः १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांनी ३० सप्टेंबरपूर्वी दावे व हरकती दाखल करून या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# सातव्या दिवशी ३८२१ गणरायांना भावपूर्ण निरोप

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेने सर्व नैसर्गिक आणि १५६ कृत्रिम विसर्जनस्थळी केलेल्या सुसज्ज व्यवस्थेमध्ये सातव्या दिवशी ३८२१ श्रीगणेशमूर्तींना भाविकांनी पुढच्या वर्षी लवकर या... अशा गजरात भावपूर्ण निरोप दिला. शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करून पर्यावरणशील दृष्टिकोन जपणाऱ्या गणेशभक्तांना महापौर सुजाता पाटील व पदाधिकारी आणि आयुक्त कैलास शिंदे यांच्या स्वाक्षरीचे पर्यावरण व स्वच्छतामित्र असे विशेष प्रशस्तिपत्र आणि प्लास्टिक पिशव्यांना नकार, कागदी किंवा कापडी पिशवीचा स्वीकार, असा संदेश असणारी कागदी पिशवी देऊन सन्मानित करण्यात आले.

इकोफ्रेंडली प्लास्टिकमुक्त श्रीगणेशोत्सव साजरा करण्याच्या आवाहनास पर्यावरणाविषयी जागरूक असणाऱ्या नागरिकांनी प्रतिसाद दिला. सर्वच विसर्जनस्थळांवर आयुक्त शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सोयी पुरविण्यात आल्या होत्या. नागरिकांना विसर्जनस्थळी निरोपाची आरती करण्यासाठी स्वतंत्र टेबलची पुरेशा संख्येने मांडणी करण्यात आली होती. निर्माल्य टाकण्यासाठी ओल्या व सुक्या स्वतंत्र निर्माल्य कलशाची व्यवस्था करण्यात आली होती.

संकलित निर्माल्य वाहून नेण्यासाठी स्वतंत्र निर्माल्य वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. याशिवाय घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ प्रमाणे दररोजच्या कचऱ्याचे घरापासूनच ओला, सुका, घरगुती घातक व सॅनिटरी अशा चार प्रकारे वर्गीकरण करण्याविषयी फलकांद्वारे तसेच ध्वनिक्षेपकाद्वारे आवाहन करण्यात आले. नैसर्गिक विसर्जनस्थळांवर आकाराने मोठ्या श्रीमूर्तींसाठी तराफ्यांची व्यवस्था होती तसेच आवश्यक विद्युत व्यवस्था आणि जनरेटर व्यवस्था करण्यात आली होती. नैसर्गिक विसर्जनस्थळापासून नजीकच्या नागरी आरोग्य केंद्रामार्फत त्या ठिकाणी वैद्यकीय पथके तैनात होती व विसर्जन व्यवस्थितरीत्या व्हावे याकरिता आवश्यक संख्येने स्वयंसेवक व लाइफ गार्ड्स विभाग कार्यालयांमार्फत कार्यरत होते. यासोबत अग्निशमन दलाचे जवानही दक्ष होते.

कृत्रिम विसर्जन स्थळांवरही सुयोग्य व्यवस्था होती. १५६ कृत्रिम तलावांबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले. महापालिकेने केलेल्या चोख व्यवस्थेमुळे तसेच सुसज्ज पोलीस यंत्रणेमुळे सर्व ठिकाणचे विसर्जन सुव्यवस्थितरीत्या पार पडले. नवी मुंबईतील २२ आणि १४ गाव परिसरातील ११ नैसर्गिक विसर्जनस्थळे तसेच १५६ कृत्रिम विसर्जनस्थळे या ठिकाणी ३६१३ घरगुती तसेच २०८ सार्वजनिक मंडळांच्या श्रीमूर्तींचे विसर्जन सुरळीतपणे झाले. यामध्ये शाडू मातीच्या ६०३ श्रीगणेशमूर्तींचे पर्यावरणपूरक दृष्टिकोन जपत भावपूर्ण विसर्जन करण्यात आले.

दरम्यान, बेलापूर विभागात पाच नैसर्गिक आणि २१ कृत्रिम विसर्जनस्थळांवर ३६९ घरगुती व १४ सार्वजनिक श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन झाले. नेरूळ दोन नैसर्गिक आणि २४ कृत्रिम विसर्जनस्थळांवर ४४५ घरगुती व २५ सार्वजनिक, वाशी दोन नैसर्गिक आणि १६ कृत्रिम विसर्जनस्थळांवर ३२७ घरगुती व ११ सार्वजनिक, तुर्भे ३ नैसर्गिक व २१ कृत्रिम विसर्जनस्थळांवर ५५२ घरगुती व ३९ सार्वजनिक, कोपरखैरणे २ नैसर्गिक व १६ कृत्रिम विसर्जनस्थळांवर ५८२ घरगुती व ८० सार्वजनिक, घणसोली ४ नैसर्गिक व १५ कृत्रिम विसर्जनस्थळांवर ८०० घरगुती व ९ सार्वजनिक, ऐरोली ३ नैसर्गिक व १८ कृत्रिम विसर्जन तलावांमध्ये ३०२ घरगुती व १६ सार्वजनिक, दिघा विभागात १ नैसर्गिक व १० कृत्रिम विसर्जनस्थळांवर २३६ घरगुती व ९ सार्वजनिक मूर्तींचे विसर्जन झाले. दिघा विभागांतर्गत १४ गावांमध्ये पाच मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.



विश्वनाथ कोळी, गव्हाण, पनवेल

# ६.९० लाखांच्या अॅल्युमिनियम प्लेट्स लंपास

**नवी मुंबई : बातमीदार**

एपीएमसी क्षेत्रातील एका बांधकाम साइटवरून सहा लाख ९० हजार रुपयांच्या १०० अॅल्युमिनियम (मायवन) प्लेट्स चोरीला गेल्याची घटना घडली आहे. वाशी सेक्टर-१८ येथील अक्षर एम्पायर एलएलपीच्या बांधकाम साइटवर १८ ते १९ सप्टेंबरदरम्यानच्या रात्री हा प्रकार घडला.

अज्ञात चोरट्याने सुरक्षेचा डोळा चुकवून साइटवरील सहा लाख ९० हजार रुपये किमतीच्या १०० अॅल्युमिनियम प्लेट्स पळवल्या. याप्रकरणी रावत यांनी दिलेल्या तक्रारीवरून एपीएमसी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पनवेल : उद्योगपती संजय पाटील यांच्या आसूडगाव येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे आनंदी आनंद ग्रुपच्या सदस्यांनी दर्शन घेतले. यावेळी नगरसेवक दशरथ म्हात्रे, विभागप्रमुख रामदास गोवारी, उद्योगपती बाळूशेठ म्हात्रे, प्रसन्ना, कोरडे, मोकल, प्रवीण इंगळे, गावडे, भाजप नेते मोतीराम कोळी, प्रमोद भोईर, पत्रकार दत्तात्रेय कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# एपीएमसी पोलीस ठाण्याच्या बाप्पाचे आयुक्तांकडून दर्शन




**नवी मुंबई : वार्ताहर**

गणेशोत्सवाचे औचित्य साधून सामाजिक भान जपत एपीएमसी पोलीस ठाण्यात विराजमान झालेल्या गणरायाचे नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दर्शन घेतले. यावेळी गणरायाची भावपूर्ण आरती करून त्यांनी उपस्थित सर्व पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी पोलीस उपआयुक्त विजय खरात आणि वाशी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त आदिनाथ बुधवंत यांची प्रमुख उपस्थिती होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गणरायाचे दर्शन घेतल्यानंतर एपीएमसी पोलीस ठाण्याच्या वतीने साकारण्यात आलेल्या विशेष सामाजिक जनजागृतीपर देखाव्याची पाहणी केली. एपीएमसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आबासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा सुंदर व प्रबोधनात्मक देखावा साकारण्यात आला आहे. वाढते सायबर गुन्हे, नागरिकांनी ऑनलाइन व्यवहार करताना घ्यावयाची खबरदारी, अमली पदार्थांचे होणारे प्राणघातक दुष्परिणाम आणि सुरक्षित समाजाची निर्मिती या संवेदनशील विषयांवर या देखाव्यातून प्रभावी संदेश देण्यात आला आहे.

धार्मिक उत्सवाच्या व्यासपीठाचा वापर करून समाजात सजगता निर्माण करण्याचा पोलिसांचा हा उपक्रम स्तुत्य असल्याचे सांगत पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी उपक्रमाचे कौतुक केले. गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांमध्ये सायबर फसवणूक व व्यसनाधीनतेच्या धोक्यांबाबत सजगता निर्माण व्हावी यासाठी एपीएमसी पोलीस ठाण्याने घेतलेला हा पुढाकार नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. या कार्यक्रमास एपीएमसी पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक गणेश मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





पनवेल : गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत यांच्या कोपर येथील निवासस्थानी विराजमान बाप्पाचे माजी सरपंच घारापुरी राजेंद्र पडते आणि गव्हाण जिल्हा परिषद चिटणीस गणेश पाटील यांनी दर्शन घेतले.

# माणगावच्या कुणबी भवनासाठी दीड कोटींचा निधी

## सामाजिक, शैक्षणिक, रोजगाराभिमुख उपक्रमांचे केंद्र उभारण्याचा संकल्प

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगावच्या सामाजिक आणि शैक्षणिक चळवळीशी अनेक वर्षांपासून नाते जोडलेल्या कुणबी भवनाच्या पुनर्विकासाला आता नवी दिशा मिळाली आहे. माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळ संचलित कुणबी भवनाच्या पुनर्विकासासाठी ऑईल इंडिया कंपनीच्या माध्यमातून १ कोटी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या निधीतून भव्य, देखणी आणि अत्याधुनिक वास्तू उभारण्यात येणार असल्याची घोषणा रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी केली.

कुणबी भवनाच्या भूमिपूजन सोहळ्यात ते बोलत होते. मुंबई–गोवा महामार्गालगत उभी राहणारी ही नवी वास्तू भविष्यात केवळ सामाजिक कार्यक्रमांची जागा न राहता समाजाच्या पुढील पिढीच्या स्वप्नांना आकार देणारे केंद्र ठरावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळ संचालित कुणबी भवन या सामाजिक वास्तूचा



पुनर्विकासाचा भूमिपूजन समारंभ सोमवार दि. २१ सप्टेंबर रोजी उत्साहात झाला. यावेळी खासदार तटकरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम, राष्ट्रवादी जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, तालुकाध्यक्ष काका नवगणे, राजिप सदस्य अस्लम राऊत, ज्येष्ठ नेते गजानन अधिकारी,हुसेन रहाटविलकर, रामभाऊ टेंबे,भागोजीबुवा डवले, सहादेव बक्कम, शांताराम भोरावकर, गंगाराम उभारे, माणगाव पंचायत समिती उपसभापती मनिषा मालोरे, पंचायत समिती सदस्य संगीता बक्कम, उपनगराध्यक्ष रिया उभारे, जिल्हा युवक राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष शादाब गैबी, माजी सरपंच राजेंद्र शिर्के, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, दिलीप जाधव, माजी पंचायत समिती सदस्य शैलेश भोनकर,सरपंच शौकत रोहेकर, राजू मोरे, तळा उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, उदय अधिकारी, सतीश पवार, सुभाष गुगले, किशोरी हिरवे आदींसह तालुक्यातून कुणबी समाज बांधव–भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुनर्विकासानंतर कुणबी भवनाचा उपयोग केवळ विवाहसोहळे, सभा आणि सामाजिक कार्यक्रमांपुरता मर्यादित राहू नये, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. युवकांसाठी शैक्षणिक मार्गदर्शन, कौशल्य विकास, रोजगाराभिमुख प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि विविध सामाजिक उपक्रम येथे राबविता येतील.

आजच्या बदलत्या काळात समाजातील तरुण पिढीला योग्य मार्गदर्शन आणि संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. त्या दृष्टीने कुणबी भवनाची नवी वास्तू ज्ञान, कौशल्य आणि सामाजिक प्रगतीचे व्यासपीठ बनू शकते. कुणबी भवनाच्या पुनर्विकासासाठी समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

---

# शिहू बेणसे येथे ६.६० लाखांच्या घरफोडीचा बनाव उघड

**नागोठणे : बातमीदार**

आंबेराई (शिहू–बेणसे) येथे घरफोडी करून सुमारे ६ लाख ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याची तक्रार करणाऱ्या फिर्यादीनेच चोरीचा बनाव केल्याचे नागोठणे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे. आर्थिक अडचणीमुळे आई व पत्नीचे सोन्याचे दागिने स्वतःच लपवून ठेवून अज्ञात चोरट्याने घरफोडी केल्याची खोटी तक्रार त्याने दाखल केली होती. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, अलिबाग आणि नागोठणे पोलिसांच्या संयुक्त तपासात हा प्रकार उघडकीस आला असून पोलिसांनी दागिने हस्तगत करून फिर्यादीला ताब्यात घेतले आहे.

नागोठणे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीपक रामचंद्र भुरे यांनी ५ सप्टेंबर २०२६ रोजी नागोठणे पोलीस ठाण्यात घरफोडीची तक्रार दाखल केली होती. ४ सप्टेंबर रोजी रात्री कृष्ण जन्माष्टमी उत्सवासाठी घराबाहेर गेल्यानंतर घरी परतल्यावर घरातील कपाटे उघडी, कपडे अस्ताव्यस्त तसेच बाथरूम व पोटमाळ्याच्या खिडकीची तोडफोड झाल्याचे दिसून आले. लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने चोरीला गेल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले होते. त्यानुसार नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सूरज पाटील यांच्या पथकाने आणि नागोठणे पोलिसांनी संयुक्तपणे सुरू केला. तांत्रिक विश्लेषण तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे फिरविल्यानंतर घरफोडीचा बनाव फिर्यादीनेच केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. आर्थिक अडचणीमुळे त्याने आई व पत्नीचे दागिने स्वतःकडे लपवून ठेवले होते. पोलिसांनी तपासाची दिशा स्पष्ट होताच चोरीस गेलेले सर्व दागिने त्याच्याच ताब्यातून हस्तगत केले.

हस्तगत करण्यात आलेल्या दागिन्यांमध्ये १२ तोळ्यांची सोन्याची गंथन, २ तोळ्यांचा सोन्याचा सर, २ तोळ्यांची सोन्याची चैन, ३ तोळ्यांची सोन्याची चैन आणि ३ तोळ्यांचा सोन्याचा हार यांचा समावेश असून, या सर्व दागिन्यांची एकूण किंमत ६ लाख ६० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी यावेळी सांगितले.

# बाप्पाच्या मिरवणुकीतील भजनात आमदार तल्लीन

**कर्जत : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र थोरवे गौरी गणपती विसर्जन सोहळ्यात आपल्या गावातील ग्रामस्थांसह सहभागी झाले होते. या मिरवणुकीत वारकऱ्यांसह भजनाचे बोल आमदारांचे तोंडून ऐकायला मिळाले. भजनात ते तल्लीन झालेले दिसत होते.



पोसरी गावातील गौरी–गणपती विसर्जन मिरवणूक निघाली. ढोल–ताशांचा गजर, भजनांचे सूर, गणरायाच्या जयघोषाने दुमदुमलेला परिसर आणि पारंपरिक पद्धतीने काढण्यात आलेली विसर्जन मिरवणूक अशा वातावरणात ग्रामस्थांनी आपल्या लाडक्या गौरी–गणपतीला निरोप देण्यासाठी गणेश भक्त निघाले होते. गौरी गणपती विसर्जन सोहळ्यासाठी पोसरी ग्रामस्थ मोठ्या संख्येने एकत्र आले. गौरी–गणपतीच्या आगमनापासून ते विसर्जनापर्यंत संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.विठ्ठल रखुमाई आणि भगवान शंकर यांच्या मंदिरांची रेलचेल आणि त्यात भजनाचे काकड आरतीचे स्वर अशी पोसरी गावाची ओळख आहे.त्या गावातील गणेश विसर्जन मिरवणूक देखील अशीच रंगतदार आणि परंपरेत निघाली.

यावेळी आमदार महेंद्र थोरवे यांनी सहभागी होत गणेश घाटापर्यंत सहभाग घेतला. वारकरी संप्रदायाशी निगडीत असलेल्या पोसरी गावातील गणेश भक्त भजनाचा उद्घोष करीत मिरवणूक काढतात.त्यावेळी भजनाच्या मैफलीत सहभागी होत आमदार महेंद्र थोरवे यांनी गौरी–गणपती उत्सवाच्या माध्यमातून भारतीय संस्कृती आणि पारंपरिक सण–उत्सवांचे जतन करण्याचे कार्य ग्रामस्थांकडून होत असल्याबद्दल आनंद व्यक्त करण्यात आला.

पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा जपण्यासोबतच त्या पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

---

# कृषी कर्मचारी एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देणार

**रोहा : प्रतिनिधी**

यावर्षी पाऊस कमी पडल्याने विदर्भ व मराठवाड्यात दुष्काळग्रस्त परिस्थिती दिसून येत आहेत. शेतकऱ्यांचे पीक वाया गेले आहे या पार्श्वभूमीवर व एल–निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी कृषी विभागातील तांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांचा एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देणार आहेत आहे.

एल–निनोच्या संभाव्य दुष्काळ परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शेतकरी बांधवांसमोर निर्माण होणाऱ्या संभाव्य संकटाच्या काळात त्यांना मदतीचा हात देण्याच्या सामाजिक भावनेतून कृषी विभागात कार्यरत एकूण १८६२२ पदांपैकी महाराष्ट्र राज्य कृषी सेवा महासंघ, पुणे तसेच महासंघातील संलग्न सर्व तांत्रिक अधिकारी व कर्मचारी संघटनांमध्ये असलेल्या तांत्रिक संवर्गातील एकूण १४४४५ अधिकारी व कर्मचारी यांनी एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधी देण्याचा निर्णय घेतला आहे.

शेतकरी हा आमच्या कार्याचा केंद्रबिंदू असून, संकटाच्या काळात त्याच्या पाठीशी उभे राहणे ही आमची सामाजिक बांधिलकी आहे. त्यामुळे कृषी विभागातील सर्व तांत्रिक अधिकारी व कर्मचारी संघटनांनी स्वेच्छेने या सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन शेतकरी बांधवांना मदतीचा हात देण्याचा निर्धार केला आहे. त्यानुसार सप्टेंबर २०२६ महिन्याच्या वेतनातून एक दिवसाचे वेतन स्वेच्छेने कपात करून मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्यात यावे, यासाठी आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही व संबंधितांना निर्देश देण्यात यावेत, ही महासंघाच्या वतीने विनंती करण्यात आली आहे.शेतकरी हितासाठी कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी संघटनाचा सामाजिक उपक्रमास उपक्रम आहे.या संबंधीत पत्रव्यवहार मुख्यमंत्री,कृषीमंत्री,कृषी आयुक्त यांना केला आहे.

# पेण रिक्षा चालक–मालक संघटनेतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

पेण रिक्षा चालक–मालक संघटनेकडून यावर्षी ही मोठ्या आनंदात गणपती बापाची स्थापना करण्यात आली आहे. यंदा संघटनेचे ४६ वे वर्ष असून मोठ्या उत्साहाच्या वातावरणात गणेश उत्सव साजरा करण्यात येत आहे. पेण रिक्षा चालक मालक संघटने तर्फे यंदा गॅलेक्सी हॉस्पिटल यांच्या सहकार्यातून गणेश भक्तांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिराला नागरिकांनी उस्फुर्त असा प्रतिसाद दिला.

गणेशोत्सवा दरम्यान पेण रिक्षा चालक–मालक संघटनेकडून समाज उपयोगी कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. आज गणेश भक्तांसाठी मोफत आरोग्य शिबिर ठेवण्यात आले या शिबिराचा मोठ्या प्रमाणावर नागरिकांना लाभ घेतला असल्याचे अध्यक्ष भरत रामचंद्र पाटील व माजी अध्यक्ष किरण म्हात्रे यांनी सांगितले. या शिबिरासाठी गॅलेक्सी हॉस्पिटल ने सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

पेण रिक्षा चालक मालक संघटनेचे गणेशोत्सवाचे ४६ वे वर्ष असून स्थापना करण्यात आलेल्या गणरायाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. यावेळी अध्यक्ष भरत रामचंद्र पाटील,उपाध्यक्ष भानुदास पाटील,माजी अध्यक्ष किरण म्हात्रे,माजी अध्यक्ष दत्तात्रय म्हात्रे आदी पदाधिकारी सदस्य उपस्थीत होते.





पेण : भाजप प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना पेणच्या नगराध्यक्ष प्रीतम पाटील. युवा नेते ललित पाटील, नगरसेवक अजय क्षीरसागर.



रोहा : महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांच्या घरी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी शेडगे कुटुंबीयांच्या वतीने मंत्री तटकरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष शेडगेंसह सुरश्री शेडगे, तेजश्री शेडगे, जयदिप शेडगे आदी.

---

# प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती साजरी

**कर्जत : प्रतिनिधी**

प्रबोधनकार ठाकरे हे जातीव्यवस्था, अंधश्रद्धा, अस्पृश्यता, हुंडापद्धती, बालविवाह, देवदासी प्रथा अशा सामाजिक दुष्कृत्यांविरुद्ध जनमत तयार करून लढणारे द्रष्टे युगपुरुष होते. पत्रकार, संपादक, वक्ते, इतिहासकार, नाटककार, चित्रकार अशा बहुआयामी व्यक्तिमत्वाचे ते धनी होते. मराठी भाषा आणि मराठी माणसाची अस्मिता जोपासण्यासाठी त्यांनी आपले शरीर चंदनाप्रमाणे झिजविले, असे प्रतिपादन कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी केले.



कोकण कृषी विद्यापीठाच्या कर्जत भात संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रबोधनकार ठाकरे जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते डॉ. मर्दाने बोलत होते. या कार्यक्रमाला कनिष्ठ भात पैदासकार डॉ. महेंद्र गवई, कीटकशास्त्रज्ञ डॉ. वैशाली सावंत, कनिष्ठ कृषिविद्यावेत्ता डॉ. नामदेव म्हसकर, सहाय्यक उद्यानविद्यावेत्ता डॉ. राजेंद्र सावळे, अधीक्षक नरसिंह निरडे, दीप्ती पाटील आदी उपस्थित होते.

कर्मवीर भाऊराव पाटील प्रबोधनकार ठाकरे यांना गुरू आणि पित्याप्रमाणे पूज्य मानत, यातच त्यांचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबतचे त्यांचे योगदान चिरस्मरणीय राहील, असे डॉ. मर्दाने यांनी सांगितले.

अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. वाघमोडे यांनी प्रबोधनकार ठाकरे यांनी जीवनभर सामाजिक समता निर्माण करण्यासाठी परिश्रम घेतले, असे नमूद करीत त्यांचे संस्कार आणि वारसा जतन करण्याचे कार्य त्याच्या भावी पिढीकडून होणे गरजेचे असल्याचे सांगितले.

सुरुवातीला सहयोगी संशोधक डॉ. वाघमोडे यांनी प्रबोधनकारांच्या प्रतिमेचे पूजन केले आणि उपस्थित शास्त्रज्ञ, अधिकारी यांनी त्यांना पुष्पान्जली अर्पण करीत विनम्र अभिवादन केले.



खोपोली : हातनोली गाव भाजप अध्यक्ष प्रदीप गोंधळी यांच्या घरचा गणराय.

# जपानने फोडला भारताला घाम!

## आशिया क्रीडा स्पर्धेत विजयासाठी झुंजवले

**सॅनो : वृत्तसंस्था**

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याच्या इराद्याने गेलेल्या भारतीय क्रिकेट संघाला पहिल्याच सामन्यात नवख्या जपानने झुंजवले. पाच षटकांच्या या सामन्यात भारतीय संघाला अवघ्या ३२ धावांत रोखल्यानंतर जपानने या माफक आव्हानाचा जोरदार पाठलाग करत भारतीयांची धडधड वाढवली, मात्र अक्षर पटेलने शेवटच्या षटकात टिच्चून मारा करत जपानला रोखले आणि टीम इंडियाला मोठी नामुष्की ओढवण्यापासून वाचवले.



षटकांच्या निर्धारित करण्यात आलेल्या या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र टी-२०मधील विश्वविजेत्या असलेल्या भारतीय संघाला नवख्या जपानी गोलंदाजांविरुद्ध प्रतिष्ठेला साजेसा खेळ करता आला नाही. सलामीवीर अभिषेक शर्मा शुन्यावरच बाद झाला, तर संजू सॅमसन नऊ आणि कर्णधार इशान किशन तीन धावा काढून माघारी परतला. त्यानंतर श्रेयस अय्यरने बाद होण्यापूर्वी काढलेल्या १६ धावांच्या जोरावर भारतीय संघाला निर्धारित पाच षटकांत चार बाद ३२ धावांपर्यंत मजल मारली.

यानंतर या सोप्या आव्हानाचा पाठलाग करताना जपानच्या संघाला यमामोटो लेकच्या रूपात पहिल्याच षटकात पहिला झटका बसला. लेक एक धाव काढून धावबाद झाला. त्यानंतर इब्राहिम ताकाहाशी हा चार धावा काढून बाद झाला. सात धावांत दोन फलंदाज माघारी परतल्यावर कर्णधार केंडल कादोवस्की फ्लेमिंगने काढलेल्या १२ धावांच्या जोरावर जपानने सामन्यात कमबॅक केले.

जपानला अखेरच्या सात चेंडूत आठ धावांची गरज असताना फ्लेमिंग बाद झाला. त्यानंतर जपानला शेवटच्या षटकात विजयासाठी आठ धावांची गरज होती, मात्र भारताकडून अक्षर पटेलने शेवटच्या षटकात टिच्चून गोलंदाजी करत जपानी फलंदाजांना फटकेबाजीपासून रोखले. अखेरच्या चेंडूवर चार धावांची गरज असताना जपानी फलंदाजांना केवळ एकच धाव काढता आली. त्यामुळे जपानला पाच षटकांत ३० धावांपर्यंतच मजल मारता आली आणि भारतीय संघाने अखेरच्या षटकापर्यंत रंगलेला हा सामना अवघ्या दोन धावांनी जिंकला.

# आशियाई क्रीडा स्पर्धेत पार्थ मानेचा 'रौप्य'वेध

**टोकियो : वृत्तसंस्था**

भारतीय नेमबाज पार्थ राकेश माने याने जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारात रौप्यपदक जिंकले. त्याने या आपल्या कामगिरीचे वर्णन एक विशेष यश आणि एक मौल्यवान शिकण्याचा अनुभव असे केले आहे.



पार्थ माने मूळचा महाराष्ट्रातील सोलापूरचा असून सध्या पनवेलजवळील करंजाडे येथे वास्तव्यास आहे. वयाच्या १३व्या वर्षी पोलीस अधिकारी वडिलांनी त्याला नेमबाजीची ओळख करून दिली. चांगल्या सुविधांसाठी पार्थचे कुटुंब स्थलांतरित झाले आणि त्याला ऑलिम्पियन सुमा शिरूर यांचे मार्गदर्शन लाभले.

रुद्रंकश पाटील आणि हिमांशू ढिल्लन यांच्यासोबत रौप्यपदक जिंकणाऱ्या पार्थने एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, हे पदक मिळवणे महत्त्वपूर्ण आहे, कारण हे त्याचे पहिले आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदक आणि वरिष्ठ आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील पहिलेच पदक आहे.

पार्थ पुढे म्हणाला की, येथे आल्यानंतर सुरुवातीला निश्चितच काही अडचणी आल्या, पण मला वाटते की हे सामान्य आहे. लहान-सहान अडथळे येणे स्वाभाविक आहे, पण आम्ही ते चांगल्या प्रकारे हाताळले आणि परिस्थितीशी जुळवून घेतले. आमच्या टीमचे फिजिओ आणि स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग ट्रेनर्सनी आम्हाला प्रभावीपणे पुन्हा उभारी घेण्यास मदत केली आणि आता आम्ही सज्ज होऊन कामगिरी करत आहोत.

भविष्याबद्दल बोलताना पार्थने, यानंतर दोहा येथे जागतिक अजिंक्यपद स्पर्धा आहे. त्यामुळे मी त्याचीही तयारी करत आहे, अशी माहिती दिली. दरम्यान, रौप्यपदकाबद्दल त्याचे अभिनंदन होत आहे.







**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि सौ. शकुंतला ठाकूर विद्यालयाचे चेअरमन नगरसेवक परेश ठाकूर आदींनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**

# रायगडच्या स्वराज गोवारी, प्रथमेश मोरेचा महाराष्ट्र निवड चाचणी शिबिरासाठी समावेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे (आरडीसीए) खेळाडू स्वराज गोवारी आणि प्रथमेश मोरे या सोळा वर्षाखालील युवा खेळाडूंचा समावेश महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या संघ निवड चाचणी शिबिरामध्ये करण्यात आला आहे.





स्वराज गोवारी हा सलामीवीर फलंदाज आहे, तर प्रथमेश मोरे हा जलदगती गोलंदाज म्हणून ओळखला जातो. दोन्ही खेळाडूंनी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आंतरजिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्ह्यासाठी खेळताना उत्कृष्ट कामगिरी केली असून गुणवत्तेच्या आधारे त्यांची निवड पुढील होणाऱ्या संघ निवड चाचणी शिबिरामध्ये करण्यात आली आहे.

स्वराज हा पनवेल तालुक्यातील गुणवान खेळाडू असून सुनील सरगर क्रिकेट अकॅडमी येथे प्रशिक्षण घेत आहे. दुसरीकडे प्रथमेश हा माणगाव तालुक्यातील प्रतिभावान युवा जलदगती गोलंदाज असून नयन शिंदे यांच्या अकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेत आहे.

दोन्ही खेळाडूंच्या प्रशिक्षकांनी त्यांच्या कामगिरीवर समाधान व आनंद व्यक्त केला आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी दोन्ही खेळाडूंना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# आज पनवेल महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत पनवेल महानगरपालिकेच्या वतीने जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा २३ सप्टेंबर रोजी नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ, सिडको समाजमंदिर दुसरा मजला नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली होणारी ही स्पर्धा १४, १७, १९ वर्षाखालील मुले व मुली अशा विविध गटांत खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन मनपा आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते होईल.

विजेत्यांना संजय कडू यांच्यातर्फे आकर्षक चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शफाली वर्मा सुऽऽसाट!

## एका वर्षात सर्वाधिक धावा करणारी ठरली फलंदाज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची धडाकेबाज सलामीवीर फलंदाज शफाली वर्माने आशियाई क्रीडा स्पर्धेच्या फायनलमध्ये संघाला दमदार सुरूवात करून देत ४८ धावांची खेळी केली. या खेळीसह ती महिलांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकाच वर्षात सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी पोहोचली आहे. तिने दक्षिण आफ्रिकेची स्टार फलंदाज लॉरा वुल्फार्टला मागे टाकले आहे.



लॉरा या अनुभवी फलंदाजाने महिलांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आतापर्यंत ८२४ धावा केल्या आहेत. शफालीने ८६३ धावा करून लॉरा वुल्फार्टला मागे टाकले. यासह शफाली ही टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकाच वर्षात सर्वाधिक धावा करणारी फलंदाज ठरली आहे.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com